cmyk

## संपादकीय

### ‘संवेदनशील मुख्यमंत्री, असंवेदनशील यंत्रणा’

लातूर जिल्ह्यातील बोंबळी गावातील शेतकरी काशिनाथ गायकवाड आणि त्यांच्या पत्नी हौसाबाई यांचे छायाचित्र काही दिवसांपूर्वी संपूर्ण राज्याने पाहिले. पावसाळ्याच्या तोंडावर वीज पडून कुटुंबाचा एकमेव बैल मृत्युमुखी पडला आणि पेरणीचे दिवस जवळ आले असताना हौसाबाईंनी स्वतःच्या खांद्यावर नांगराचे जू घेऊन शेत नांगरण्याचा प्रयत्न केला. हे चित्र केवळ एका कुटुंबाच्या दुःखाचे नव्हते; ते महाराष्ट्रातील हजारो लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या संघर्षाचे प्रतीक होते.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–८४ | रविवार दि.१४ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### धीरज सेठ होणार भारताचे नवे लष्करप्रमुख

दिल्ली: केंद्र सरकारने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांची भारताचे पुढील लष्करप्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. ३० जूनपासून ते पदाची धुरा सांभाळतील. लष्कराच्या आधुनिकीकरणातील त्यांच्या योगदानासाठी ते एक अग्रगण्य जनरल ऑफिसर म्हणून ओळखले जातात. संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ‘‘ राष्ट्रपतींनी लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांची जनरल पदावर पुढील चीफ ऑफ आर्मी स्टाफ (लष्करप्रमुख) म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी दिली आहे. ही नियुक्ती ३० जून २०२६ पासून लागू होईल आणि ते जनरल उपेंद्र द्विवेदी यांची जागा घेतील. लेफ्टनंट जनरल सेठ यांचा कार्यकाळ ३१ ऑगस्ट २०२८ पर्यंत असेल.

### भारतीय हवाई दलाचे विमान कोसळले, ५ जवान शहीद

गुवाहाटी: आसाममध्ये एक मोठी दुर्घटना झाली आहे. जोरहाट विमानतळावर उतरत असताना, भारतीय हवाई दलाचे अँटोनोव्ह एएन–३२ हे मालवाहू विमान कोसळले. विमानाला भीषण आग लागल्याची माहिती आहे. आसाममधील जोरहाट हवाई तळावर एएन–३२ या मालवाहू विमानाला झालेल्या अपघातात भारतीय हवाई दलाच्या पाच कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात सह–वैमानिक बचावला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताचे कारण शोधण्यासाठी भारतीय हवाई दलाने चौकशीचे आदेश दिले आहेत, अशी माहिती हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी दिली. आसाममधील जोरहाट येथील हवाई दल तळावर लँडिंग करताना लष्करी विमानाचा अपघात झाला.

### वर्षात कृषी कर्जाची मागणी अधिक राहणार– नाबार्ड

मुंबई: कृषी निविष्ठांवरील वाढलेला खर्च, किसान क्रेडिट कार्ड योजनेचा व्यापक विस्तार आणि शेतीशी संलग्न क्षेत्रे तसेच यांत्रिकीकरण व पायाभूत सुविधांमधील वाढत्या गुंतवणुकीमुळे २०२६–२७ मध्ये कृषी आणि ग्रामीण भागातून कर्जाची मागणी अधिक राहण्याची शक्यता नाबार्डने व्यक्त केली आहे. गेल्या दशकभरात कृषी कर्जाच्या मागणीत लक्षणीयरीत्या वाढ झाली आहे आणि हळूहळू का होईना कर्जाची मागणी वाढणे अपेक्षित आहे, असे नाबार्डचे उपव्यवस्थापकीय संचालक अजय कुमार सूद यांनी म्हटले आहे. चालू आर्थिक वर्षात कृषी आणि ग्रामीण भागातून कर्जाच्या मागणीत वाढ होईल का?, यावर बोलताना सूद यांनी सांगितले, देशात २०१४–१५ पासून कृषी कर्जाचे वितरण सुमारे ८.५ लाख कोटी रुपयांवर होते. त्याची तुलना २०२५–२६ मधील आकडेवारीशी केली हा आकडा सुमारे ३० लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला. ही आकडेवारी तात्पुरती स्वरुपाची आहे. पुढील काळात त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड, दि.१३ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६८.५० क्विंटल | २,००० | २,५०१ | २,२९९ |
| ज्वारी/हायब्रिड : ४८.५० क्विंटल | २,१६४ | ३,९२७ | २,८९२ |
| मका/लोकल: २.५० क्विंटल | २,०३० | २,०३० | २,०३० |
| तूर : ०.५० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: १६.०० क्विंटल | २,२९६ | २,४६५ | २,३८१ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,३०१ | ५,४०० | ५,३५० |

# युरिया खरेदीसाठी सातबारा सक्ती नाही, कृषिमंत्र्यांकडून कारवाईचा इशारा

पुणे । प्रतिनिधी



**राज्यातील काही भागात युरिया आणि इतर खतांच्या खरेदीसाठी सातबारा मागितला जात असल्याची बाब समोर आली आहे. याची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली आहे. युरिया खत खरेदीसाठी जर कुणी सातबारा मागत असेल तर ते चुकीचे आहे. याबाबत कारवाई केली जाईल, असा इशारा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिला आहे.**

अकोला जिल्ह्यात खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना पहाटेपासून रांगेत उभे राहण्याची वेळ आली. कृषी सेवा केंद्रावर शेतकऱ्यांची मोठी झुंबड उडाल्याचे दिसून आले. या पार्श्वभूमीवर अकोला जिल्हा प्रशासनाने खत खरेदीसाठी शेतकऱ्यांची ओळख पटावी यासाठी ७/१२ उतारा आणि आधार कार्डची सक्ती केली होती. पण हा निर्णय मागे घेण्यात आला. युद्धामुळे खत मिळणार नाही, अशी भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. पण आपल्याकडे खतांची पुरेशी उपलब्धतता आहे. केंद्र सरकारने जे आपल्याला आवंटन मंजूर केले आहे; ते आपल्याला मिळाले तर अडचण येणार नाही. पण शेतकरी युरियाची मागणी अधिक करतात. त्यासाठी युरियाच्या बाबतीत थोडे दिवस बंधन आणणे गरजेचे आहे, असे मत कृषिमंत्र्यांनी व्यक्त केले आहे. युद्धामुळे खतांच्या बाबतीत काही अडचणी निर्माण झाल्या आहेत. राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस केंद्रीय मंत्र्यांशी याबाबत बोलत आहेत. आपल्याकडे आज युरिया, डीएपीचा बफर साठा आहे. यामुळे अडचण येणार नाही, असा दावा त्यांनी केला. राज्य सरकारने कर्जमाफी योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांसाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी बंधनकारक केली आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना भरणे म्हणाले की, कोणताही शेतकरी यापासून वंचित राहणार नाही. शेतकरी ॲग्रीस्टॅकशी जोडले जातील. ॲग्रीस्टॅक नोंदणीसाठी आम्ही शिबिरे आयोजित करु. शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही. खत खरेदीसाठी ऑनलाईन बुकिंगची सुविधा प्रायोगिक तत्त्वावर दोन जिल्ह्यांत राबवली जात आहे. यासाठी केंद्र सरकारचे ॲप आहे. त्यात काही दुरुस्ती करण्यासाठी

◀◀ पान २ वर

## कॉकरोच जनता पार्टीचे आता नागपूरमध्ये आंदोलन

### तयारी सुरू; १६ जूनसाठी पोलिसांकडे मागितली परवानगी

नागपूर । प्रतिनिधी

नीट पेपर लीक, बेरोजगारी आणि शिक्षण व्यवस्थेशी संबंधित विविध प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीने आता नागपुरात मोठे आंदोलन करण्याची तयारी सुरू केली आहे. येत्या १६ जून रोजी संविधान चौक येथे आंदोलन करण्यासाठी पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी पोलिसांकडे परवानगी मागितली असून, या प्रस्तावित आंदोलनाबाबत युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.

पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सीताबर्डी पोलीस ठाण्यात जाऊन आंदोलनासाठी परवानगी अर्ज सादर केला. यावेळी



अनेक युवकांच्या हातात गुलाबाची फुले होती. पक्षाचे स्थानिक पदाधिकारी दुर्गेश कुडके यांनी सांगितले की, आंदोलनाची प्राथमिक तयारी सुरू करण्यात आली असून मोठ्या संख्येने युवक सहभागी होण्याची शक्यता आहे. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके

◀◀ पान २ वर

# काँग्रेसला उशिरा सूचलेले शहाणपण!

## परीक्षांतील घोटाळ्याविरोधात आता काँग्रेसचे आंदोलन

दिल्ली । प्रतिनिधी

**नीट, एनटीए, एसएससी परीक्षा घोटळा, पेपरफुटी आणि वाढती बेरोजगारी या मुद्द्यांवर काँग्रेस आता देशभरात मोठे आंदोलन उभारणार आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली या आंदोलनाची सुरुवात १७ जून रोजी राजस्थानमधील कोटा येथून होणार आहे. काँग्रेसचे महासचिव (संघटन) के. सी. वेणुगोपाल यांनी याबाबत माहिती दिली. या विषयावर कॉकरोच जनता पार्टीने मोठे आंदोलन यापुर्वीच केले असून, अजूनही जागोजागी त्यांचे आंदोलन सुरू आहे. मात्र राष्ट्रीय पक्ष असलेल्या काँग्रेसला आता जाग आली असून याला उशिरा सुचलेले शहाणपण असे म्हणावे लागेल.**

के. सी. वेणुगोपाल यांनी सांगितले की, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राहुल गांधी यांच्या नेतृत्वात विद्यार्थी व युवकांच्या प्रश्नांवर देशव्यापी जनजागृती मोहीम राबवली जाणार आहे. वेणुगोपाल म्हणाले



की, गेल्या काही वर्षांत पेपरफुटी, परीक्षा प्रक्रियेतील गोंधळ, भरतीतील अनियमितता आणि बेरोजगारीमुळे लाखो तरुणांचे भविष्य धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर राहुल गांधी देशभरातील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. या अभियानाअंतर्गत मोठ्या विद्यार्थी परिषदांचे आयोजन करण्यात येणार आहे. कोटा येथे १७ जूनला पहिली सभा होईल. त्यानंतर १० जुलैला इलाहाबाद, ११ जुलैला पटना आणि १४ जुलैला दिल्ली येथे विद्यार्थी संमेलनांचे आयोजन करण्यात येणार आहे. काँग्रेसच्या मते, परीक्षा घोटाळ्यांमुळे आणि पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचा

◀◀ पान २ वर

# बेकायदेशीर घुसखोरीवर केंद्र सरकार आक्रमक


## सीमावर्ती जिल्ह्यांमधील लोकसंख्याशास्त्रीय बदलांचा अहवाल सादर करण्याचे अमित शहा यांचे आदेश

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

देशातील लोकसंख्याशास्त्रीय बदलांबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारा (दि. १३) नवी दिल्लीत एक बैठक पार पडली. देशाच्या सीमावर्ती जिल्ह्यांमधील लोकसंख्याशास्त्रीय बदलांचा अभ्यास करून अहवाल सादर करण्याचे निर्देश केंद्रीय गृहमंत्री अमिताह यांनी उच्चस्तरीय समितीला दिले. तसेच, परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी सीमावर्ती भाग, महानगरे आणि औद्योगिक शहरांना भेट देण्याचे निर्देशही त्यांनी समितीला दिले.

यानुसार निवृत्त न्यायमूर्ती पी. पी. नावलेकर यांच्या अध्यक्षतेखालील ही समिती, अवैध स्थलांतर आणि लोकसंख्येतील अनैसर्गिक बदलांचे शास्त्रीय मूल्यांकन करण्यासाठी देशाच्या सीमावर्ती जिल्ह्यांना आणि प्रमुख शहरांना भेट देणार आहे. केंद्र सरकारने बेकायदेशीर घुसखोरी आणि इतर असामान्य कारणांमुळे संपूर्ण देशात होत असलेल्या लोकसंख्याशास्त्रीय बदलांचे सर्वसमावेशक

◀◀ पान २ वर




# रोहित पवारांची प्रकृती खालावली!




### काँग्रेसचा पाठिंबा; हर्षवर्धन सपकाळही उपोषणाला बसणार

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे उपोषण सुरू केले. राज्य सरकारने जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, जोपर्यंत मागणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत ‘अन्नदात्यासाठी अन्नत्याग’ सुरूच राहील, असा इशाराही रोहित पवार यांनी दिला. त्यांच्या या उपोषणाला आता काँग्रेसनेही जाहीर पाठिंबा दर्शवला असून, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हेदेखील पंढरपुरात जाऊन उपोषणाला बसणार आहे. खुद्द सपकाळ यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्या संदर्भातील घोषणा केली आहे.

पंढरपुर । प्रतिनिधी

शेतकरी कर्जमाफीच्या मागणीसाठी पंढरपुरात सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनादरम्यान राष्ट्रवादी (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार यांची प्रकृती खालावल्याची माहिती समोर आली आहे. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी डॉक्टरांच्या पथकाने त्यांची तपासणी केली असून रक्तातील साखरेची पातळी लक्षणीयरीत्या घसरल्याचे आढळले आहे.

शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळावा आणि कर्जमाफीतील जाचक अटी रद्द कराव्यात, या मागणीसाठी रोहित पवार १२ जूनपासून पंढरपुरात अन्नत्याग आंदोलन करत आहेत. ‘‘जोपर्यंत कर्जमाफीतील जाचक अटी हटवल्या

◀◀ पान २ वर



## हि भेट भविषयतील चाहूल

पुणे : अजित दादा पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेतेमाजी मंत्री आ दिलीप वळसे पाटील यांच्या मंचर येथील निवासस्थानी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली शरद पवारांचे विश्वास आणि दादाच्या राष्ट्रवादीतील ज्येष्ठ नेते म्हणून वळसे पाटील यांची ओळख आहे मुख्यमंत्र्यांची भेट म्हणजे आगामी राजकीय घडामोडीची चाहूल म्हणावी लागेल.

# ‘ऑपरेशन टायगर’ चा दिवस ठरला?

## उद्धव ठाकरेंना मोठा झटका बसणार, शिंदे शिवसेना नेत्याचा दावा

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या चर्चेत असलेल्या ‘ऑपरेशन टायगर’ संदर्भात केंद्रीय राज्यमंत्री तथा शिवसेना नेते प्रतापराव जाधव यांनी मोठा दावा केला आहे. ‘‘ऑपरेशन टायगर अंतिम टप्प्यात पोहोचले असून, एकनाथ शिंदे योग्य वेळ आणि मुहूर्त ठरवतील त्या दिवशी ते पूर्ण होईल,’’ असे जाधव यांनी म्हटले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे ठाकरे गटातील संभाव्य पक्षांतराच्या चर्चांना पुन्हा वेग आला आहे.**


परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातील सुनेगाव येथे एका



कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना प्रतापराव जाधव यांनी हा दावा केला. ते म्हणाले, ‘‘या ऑपरेशनबाबत ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनीही अप्रत्यक्षपणे कबुली दिली आहे. त्यामुळे आम्हाला यापुढे अधिक काही बोलण्याची गरज नाही.’’ दरम्यान, अंबादास दानवे यांनी यापूर्वी प्रतिक्रिया देताना, ‘‘काही लोक संपर्कात आहेत, काही उघडपणे बोलतात. आम्हाला सर्व माहिती आहे. लोकसभा निवडणुकीपासून संपर्कात असल्याच्या चर्चा सुरू आहेत. आता ते अधिकृतपणे मान्य करायला हवे,’’ असे विधान केले होते. याच वक्तव्याचा आधार घेत प्रतापराव जाधव यांनी ठाकरे गटावर निशाणा साधला. या सर्व घडामोडींवर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी जोरदार पलटवार केला आहे. ‘‘ही महाराष्ट्रातील विकृती आहे. महाराष्ट्राला नासवण्याचे काम सुरू आहे. योग्य वेळी महाराष्ट्रातील जनता याला उत्तर देईल,’’ असे ते म्हणाले. तसेच, ‘ऑपरेशन टायगर’ची भाषा करणाऱ्यांवर टीका करत त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावरही अप्रत्यक्ष निशाणा साधला.

### ठाकरेंकडून आज तातडीची बैठक

दरम्यान, या चर्चांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवारी (१४ जून) ‘मातोश्री’ येथे पक्षाच्या सर्व खासदारांची तातडीची बैठक बोलावली आहे. आगामी राजकीय परिस्थिती आणि पक्षाची रणनीती यावर या बैठकीत चर्चा होणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे या बैठकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.



# मान्सून १८ जून पर्यंत लांबला!

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील हवामान शुष्क अन कोरडे झाल्याने मध्यमहाराष्ट्र अन मराठवाड्याला दोन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान मान्सून सध्या सोलापूर–बारातमी भागात अडखळला असून १८ जून पर्यंत मोठ्या पावसाचा अंदाज नाही. शनिवारी विदर्भातील अकोला येथे ४३.५ अंश इतके तापमान नोंदले गेले.

उत्तर भारतातून आलेल्या कोरड्या आणि उष्ण वाऱ्यांच्या प्रभावामुळे राज्यातील

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# 'संवेदनशील मुख्यमंत्री, असंवेदनशील यंत्रणा'

लातूर जिल्ह्यातील बोंबळी गावातील शेतकरी काशिनाथ गायकवाड आणि त्यांच्या पत्नी हौसाबाई यांचे छायाचित्र काही दिवसांपूर्वी संपूर्ण राज्याने पाहिले. पावसाळ्याच्या तोंडावर वीज पडून कुटुंबाचा एकमेव बैल मृत्युमुखी पडला आणि पेरणीचे दिवस जवळ आले असताना हौसाबाईंनी स्वतःच्या खांद्यावर नांगराचे जू घेऊन शेत नांगरण्याचा प्रयत्न केला. हे चित्र केवळ एका कुटुंबाच्या दुःखाचे नव्हते; ते महाराष्ट्रातील हजारो लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या संघर्षाचे प्रतीक होते. आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल क्रांती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आर्थिक महासत्ता बनण्याच्या दाव्यांमध्ये रमलेल्या देशाला या चित्राने ग्रामीण वास्तवाचे विदारक दर्शन घडविले. या घटनेची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने घेतली. प्रशासनाला निर्देश देऊन गायकवाड कुटुंबाला नवीन बैल आणि आर्थिक मदत देण्यात आली. ही कृती निश्चितच कौतुकास्पद होती. शासनाने संकटात सापडलेल्या एका कुटुंबाच्या मदतीसाठी संवेदनशीलता दाखवली, हे लोकशाही व्यवस्थेचे सकारात्मक रूप म्हणावे लागेल. मात्र या मदतीनंतर उघडकीस आलेल्या वास्तवाने पुन्हा एकदा सरकारी यंत्रणेतील त्रुटींचा पर्दाफाश केला. शेतकऱ्याला देण्यात आलेला बैल आजारी असल्याचे पशुवैद्यकीय तपासणीत निष्पन्न झाले. म्हणजे ज्या मदतीने शेतकऱ्याचा प्रश्न सुटायला हवा होता, तीच मदत त्याच्यासाठी नवीन समस्येचे कारण ठरली.

ही बाब अत्यंत गंभीर आहे. कारण हा केवळ एका आजारी बैलाचा प्रश्न नाही. हा संपूर्ण प्रशासकीय कार्यपद्धतीतील निष्काळजीपणा, बेजबाबदारपणा आणि उत्तरदायित्वाच्या अभावाचे प्रतीक आहे. मुख्यमंत्र्यांच्या थेट आदेशानंतर दिल्या जाणाऱ्या मदतीतही जर अशी हलगर्जीपणा होत असेल, तर सामान्य परिस्थितीत मदतीसाठी धावपळ करणाऱ्या शेतकऱ्यांची अवस्था काय होत असेल, याची कल्पनाच केलेली बरी. शासनाच्या सर्वोच्च स्तरावरून संवेदनशीलता दाखविली जाते; परंतु स्थानिक पातळीवर ती संवेदनशीलता कृतीत उतरविण्यात यंत्रणा वारंवार अपयशी ठरते. हीच खरी शोकांतिका आहे.

भारतीय शेती आजही अनेक अर्थांनी संकटाच्या गर्तेत आहे. हवामान बदलामुळे पाऊस अनिश्चित झाला आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी गारपीट, तर कधी वीज पडून होणारे नुकसान अशा संकटांची मालिका शेतकऱ्यांच्या मागे लागलेली आहे. उत्पादन खर्च सातत्याने वाढत आहे, तर उत्पन्न मात्र स्थिर किंवा अनिश्चित आहे. अशा परिस्थितीत शेतीसाठी लागणारी साधने, जनावरे आणि संसाधने यांचे महत्त्व अधिक वाढते. गायकवाड कुटुंबासारख्या भूमिहीन आणि बटाईवर शेती करणाऱ्या कुटुंबासाठी बैल म्हणजे केवळ जनावर नसून उपजीविकेचा आधारस्तंभ आहे. तो गमावणे म्हणजे उत्पन्नाचे साधन गमावणे होय.

याच पार्श्वभूमीवर प्रशासनाने दिलेला बैल आजारी निघणे हा केवळ तांत्रिक दोष म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. कोणत्याही मदतीचे वितरण करण्यापूर्वी तिची गुणवत्ता तपासणे ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी असते. पशुवैद्यकीय तपासणी, आरोग्य प्रमाणपत्र, योग्य निवड आणि प्रत्यक्ष पडताळणी या सर्व प्रक्रिया काटेकोरपणे पार पडणे अपेक्षित होते. मात्र तसे झाले नाही. परिणामी, मदतीचा उद्देशच फोल ठरला.यापेक्षाही अधिक चिंताजनक बाब म्हणजे दोष लक्षात आल्यानंतरही त्याच्या दुरुस्तीत झालेला विलंब. शेतकऱ्याने प्रामाणिकपणे प्रशासनाला माहिती दिल्यानंतर तातडीने पर्यायी व्यवस्था होणे अपेक्षित होते. मात्र त्यालाही दिरंगाईचा सामना करावा लागला. शेवटी मुख्यमंत्र्यांना पुन्हा हस्तक्षेप करून चांगला बैल उपलब्ध करून देण्याचे आदेश द्यावे लागले. याचा अर्थ स्थानिक प्रशासनाने आपल्या जबाबदारीचे भान गमावले आहे, असेच म्हणावे लागेल.

या प्रकरणाने आणखी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आजही एखादी घटना सोशल मीडियावर व्हायरल होणे किंवा वृत्तपत्रांमध्ये झळकणे आवश्यक का ठरते? अनेक गावांमध्ये अशाच प्रकारचे संघर्ष करणारे हजारो शेतकरी आहेत. त्यांचे दुःख कॅमेऱ्यात बंदिस्त होत नाही, त्यामुळे त्यांच्यापर्यंत मदतीचा हातही पोहोचत नाही. शासन व्यवस्था अशी असावी की संकटाची माहिती मिळताच ती आपोआप सक्रिय व्हावी. मदतीसाठी शेतकऱ्याला याचना करावी लागू नये आणि प्रसिद्धीच्या झोतात यावे लागू नये. आज प्रशासनाकडे अत्याधुनिक साधने उपलब्ध आहेत. डिजिटल नोंदी, ऑनलाइन अर्ज, भू-नकाशे, उपग्रह निरीक्षण, ड्रोन सर्वेक्षण आणि तत्काळ संवाद यंत्रणा यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. अशा परिस्थितीत मदतीच्या प्रक्रियेत अजूनही ढिसाळपणा आणि लालफितशाही आढळणे ही चिंतेची बाब आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ घोषणांपुरता न राहता प्रत्यक्ष सेवेत दिसला पाहिजे. शेतकऱ्यांच्या नुकसानीची तत्काळ नोंद, पडताळणी आणि मदत वितरण यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करणे काळाची गरज आहे.

लोककल्याणकारी राज्याची खरी ओळख ही केवळ मदत जाहीर करण्यात नसते, तर ती मदत वेळेवर, अचूक आणि सन्मानपूर्वक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात असते. शासनाच्या संवेदनशीलतेला प्रशासनाच्या कार्यक्षमतेची जोड मिळाली, तरच मदतीचा खरा अर्थ साध्य होतो. अन्यथा, घोषणा आणि प्रत्यक्ष वास्तव यांच्यातील दरी वाढत जाते. गायकवाड कुटुंबाच्या बाबतीत ही दरी स्पष्टपणे दिसून आली आहे.

मुख्यमंत्र्यांनी पुन्हा हस्तक्षेप करून योग्य बैल उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत, ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र या घटनेतील निष्काळजीपणासाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची चौकशी आणि उत्तरदायित्व निश्चित करणेही तेवढेच आवश्यक आहे. कारण जबाबदारी निश्चित झाली नाही, तर अशा चुका पुन्हा घडत राहतील. प्रशासनातील संवेदनशीलता ही केवळ वरिष्ठांच्या आदेशांवर अवलंबून न राहता प्रत्येक स्तरावरील अधिकाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीचा भाग बनली पाहिजे. बोंबळी गावातील हौसाबाईंच्या खांद्यावर पडलेले नांगराचे जू हे केवळ एका स्त्रीच्या संघर्षाचे प्रतीक नव्हते; ते संपूर्ण व्यवस्थेला विचार करायला भाग पाडणारे वास्तव होते. त्या चित्रामुळे एका कुटुंबाला मदत मिळाली, ही आनंदाची बाब आहे. परंतु भविष्यात कोणत्याही शेतकरी कुटुंबाला अशा परिस्थितीतून जावे लागू नये, यासाठी प्रशासनाने आपल्या कार्यपद्धतीत मूलभूत बदल करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या मदतीची थट्टा होणार नाही, त्यांना सन्मानाने आणि वेळेवर मदत मिळेल, अशी यंत्रणा उभी राहिली तरच खऱ्या अर्थाने लोकाभिमुख आणि शेतकरीहितैषी शासनाची संकल्पना साकार होईल. हाच या घटनेतून घेण्यासारखा सर्वात मोठा धडा आहे.

# मृत्यूनंतरही जग पाहण्याचा अधिकार देणारे नेत्रदान हीच खरी मानवसेवा

## आदित्य कृषी महाविद्यालयात नेत्रदान जनजागृती व्याख्यान उत्साहात; १० विद्यार्थ्यांचा नेत्रदानाचा संकल्प

**बीड । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ (परभणी) संलग्नित, आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'नेत्रदान श्रेष्ठ दान' या विषयावर जनजागृती व्याख्यान उत्साहात पार पडले. या वेळी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करत अंधत्व निर्मूलनासाठी योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले. व्याख्यानातून प्रेरणा घेत १० विद्यार्थ्यांनी नेत्रदान करण्याचा संकल्प करत आपले संमती फॉर्म भरून दिले. यावेळी २०५ विद्यार्थी उपस्थित होते. मृत्यूनंतरही दुसऱ्या व्यक्तीला हे सुंदर जग पाहण्याचा अधिकार मिळवून देणारे 'नेत्रदान' हीच खरी मानवसेवा असल्याचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी म्हणाले.



आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवले जात आहेत. आदित्य कृषी महाविद्यालयात नेत्रदान जनजागृती व्याख्यान उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. विवेक कुलकर्णी म्हणाले की, नेत्रदान हे सर्व दानांमध्ये श्रेष्ठ आहे. एखादी व्यक्ती या जगाचा निरोप घेतल्यानंतरही तिच्या नेत्रांद्वारे दोन अंध व्यक्तींना नवी दृष्टी मिळू शकते. मृत्यूनंतरही आपल्या डोळ्यांनी हे सुंदर जग पाहण्याचा अधिकार दुसऱ्याला देणे, हीच खरी मानवसेवा आहे. या वेळी त्यांनी समाजात असलेल्या नेत्रदानाविषयी च्या विविध गैरसमजांचे खंडन केले.मृत्यूनंतर अल्पावधीतच नेत्रदान करणे का महत्त्वाचे आहे, त्याची कायदेशीर व वैद्यकीय प्रक्रिया काय असते, यावर त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला. शिक्षणासोबतच प्रत्येक विद्यार्थ्याने समाजसेवेची भावना जोपासणे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रा.श्याम भुतडा यांनी महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. समाजात नेत्रदानाविषयी अजूनही मोठ्या प्रमाणावर उदासीनता आहे, ती दूर करण्यासाठी युवा पिढीमध्ये अशा प्रकारच्या जनजागृती उपक्रमांची अत्यंत गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

### १० विद्यार्थ्यांचा जागेवरच संकल्प, फॉर्म भरून दिले!

या व्याख्यानाने प्रेरित होऊन महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांनी तत्काळ नेत्रदान करण्याचा संकल्प करत आपले फॉर्म भरून दिले. त्यांच्या या धाडसी व सामाजिक निर्णयाबद्दल महाविद्यालय प्रशासनाच्या वतीने त्यांचे विशेष स्वागत करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमात महाविद्यालयातील एकूण २०५ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. हा उपक्रम वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. आर. पी. कदम तसेच क्रीडा अधिकारी प्रा. संघर्ष शृंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. श्रद्धा एडके, डॉ. धनंजय सातपुते, डॉ. निर्मला ठोके, प्रा. वैशाली मिसाळ, डॉ. रामप्रसाद मोरे, डॉ. प्रसाद खेडकर, डॉ. ब्रह्मदेव मुंडे, प्रा. प्रिया गव्हाणे, प्रा. शितल बोराडकर, प्रा. युवराज धावणे, प्रा. राऊत यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

नेत्र दानासारख्या श्रेष्ठ दानाविषयी तरुण वयातच जनजागृती करणारा आदित्य कृषी महाविद्यालयाचा हा उपक्रम समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. या स्तुत्य कार्याबद्दल महाविद्यालयाचे व सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन

**-डॉ. आर. पी. कदम,**
**(विद्यार्थी कल्याण अधिकारी,**
**वनामकृवि, परभणी)**

# आईचा चारधाम दर्शनाचा संकल्प लेक करतेय पूर्ण!

## ना. पंकजाताई मुंडे यांनी आई प्रज्ञाताई आणि बहिण डॉ. प्रितमताई मुंडे यांच्यासह द्वारकेत घेतले श्रीकृष्णाचे दर्शन



**मुंबई । प्रतिनिधी**

चारधाम यात्रेचे दर्शन घडवून आणण्याचा आईसाठी केलेला संकल्प राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे पूर्ण करत आहेत. आज त्यांनी आई प्रज्ञाताई व बहिण माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्यासह द्वारकेत भगवान श्रीकृष्णाचे दर्शन घेतले. याठिकाणी देशातील एकमेव असलेल्या गो हॉस्पिटलला भेट दिली तसेच पंतप्रधान मोदींच्या यशस्वी कारकिर्दीबद्दल वृक्षारोपणही केले.

यासंदर्भात एक पोस्ट करत ना. पंकजाताईंनी आईचा चारधाम करण्याचा संकल्प पूर्ण करत असल्याचे म्हटले आहे. एक दिवस मिळाला की आई आणि बहिण प्रीतमताईंसह आम्ही निघालो.आज देवभूमी द्वारका येथे श्री द्वारकाधीश मंदिराचे दर्शन घेण्याचे भाग्य लाभल्याचे त्यांनी म्हटले आहे. यावेळी द्वारकाधीश मंदिर ट्रस्ट आणि भाजपा पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. काही दिवसांपूर्वीच ना. पंकजाताईंनी आईला घेऊन बद्रिनाथ, केदारनाथ, गंगोत्री, यमुनोत्रीला जाऊन दर्शन घेतले होते.

### गो हॉस्पिटलला भेट ; वृक्षारोपणही केले

भारतातील एकमेव आएसओ मानांकित गोमातेचे रुग्णालय असलेल्या 'द्वारकाधीश गो हॉस्पिटल' येथे ना. पंकजाताईंनी भेट देऊन पाहणी केली. गोसेवेचे हे अद्ययावत कार्य अतिशय कौतुकास्पद आहे. याप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष रामजीभाई मैजीठीया, अशोक राजा व इतर सहकारी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश १२ वर्षे अविरतपणे विकासाच्या वाटेवर अग्रेसर आहे. देशातील सर्वात जास्त काळ पंतप्रधान म्हणून नेतृत्व करण्याचा ऐतिहासिक विक्रम त्यांनी कालच केला. याच औचित्याने आज देवभूमी द्वारका येथे स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांसमवेत ना. पंकजाताईंनी वृक्षारोपण केले.

# डॉ.सुनील बोबडेंनी केली वैद्यकीय क्षेत्रातील मोठी क्रांती

## सर्जरीला केले 'बायपास';क्रॉनिक टोटल ऑक्लूजन अँजिओप्लास्टी पहिल्यांदाच बीडमध्ये यशस्वी

**बीड । प्रतिनिधी**

अल्पवधीत बीड जिल्ह्यात हृद्यरोगासाठी नावलौकिक मिळवलेल्या मेडिकेयर हॉस्पिटलमधील डॉ.सुनील बोबडे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील मोठी क्रांती केली आहे.क्रॉनिक टोटल ऑक्लूजन (हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या कोरोनरी धमन्यांपैकी एक धमनी ३ महिने किंवा त्याहून अधिक काळासाठी पूर्णपणे १०० टक्के ब्लॉक असते.) अशी अँजिओप्लास्टी पहिल्यांदाच बीडमध्ये यशस्वी केली आहे.हृदयरोगतज्ञ डॉ.सुनील बोबडे यांनी बीडमध्ये अतिशय दुर्मिळ आणि गंभीर असलेल्या रुग्णावर केलेल्या या अतिजोखमीच्या शस्त्रक्रियेमुळे त्या रुग्णाला तर जीवदान मिळालेच पण हृदयाचे आजार असलेल्या रुग्णांसाठी देखील ही शस्त्रक्रिया दिलासा आणि आशेची किरण ठरणार आहे.

पांडुरंग गमे (वय-४९) असे रुग्णाचे नाव असून त्या मागील अनेक महिन्यांपासून हृदयाच्या आजाराने त्रस्त होते.त्यामुळे त्यांनी मेडिकेयर हॉस्पिटलला भेट देऊन डॉ.सुनील बोबडे यांच्याकडे निदान केले.यावेळी डॉ.बोबडे यांनी रुग्णाच्या तपासण्या केल्यानंतर रुग्णाला क्रॉनिक टोटल ऑक्लुजन ही गंभीर समस्या असल्याचे स्पष्ट झाले.गमे यांना आपल्याला झालेल्या आजाराबाबत माहिती नव्हती,त्यांचे नातेवाईक देखील तणावात होते.कारण बीड जिल्ह्यात अश्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करायच्या झाल्या तर छत्रपती संभाजीनगर किंवा पुणे.मुंबईसारख्या ठिकाणी धाव घ्यावी लागायची.मात्र डॉ.सुनील बोबडे यांनी रुग्ण आणि नातेवाईकांना विश्वास देत अतिशय जोखमीची अशी शस्त्रक्रिया बीडमध्ये पहिल्यांदाच करत वैद्यकीय क्षेत्रातील मोठी क्रांती केली आहे.क्रॉनिक टोटल ऑक्लूजनवर शस्त्रक्रिया झाल्यामुळे रुग्णाला जीवदान मिळाले असून बीड जिल्ह्यातून डॉ.सुनील बोबडे यांच्या शस्त्रक्रियेबाबत अभिनंदन केले जात आहे.



### सर्जरीला केले 'बायपास'

रुग्ण पांडुरंग गमे यांना गेल्या काही काळापासून छातीत दुखणे आणि श्वास घेण्यास त्रास होत होता. तपासणीअंती त्यांच्या हृदयाची मुख्य रक्तवाहिनी १००% पूर्णपणे बंद असल्याचे समोर आले. अशा रुग्णांवर सहसा बायपास सर्जरी करण्याचा सल्ला दिला जातो, कारण १००% बंद असलेली रक्तवाहिनी अँजिओप्लास्टीद्वारे उघडणे अत्यंत जोखमीचे आणि कौशल्याचे काम असते.मात्र हृदयरोग तज्ज्ञ डॉ.सुनील बोबडे व त्यांच्या टीमने हे आव्हान स्वीकारत अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि कौशल्याचा वापर करून शरीराची मोठी चिरफाड न करता, केवळ अँजिओप्लास्टीद्वारे ही १००% बंद असलेली रक्तवाहिनी यशस्वीपणे पूर्ववत केली.सध्या रुग्णाची प्रकृती उत्तम असून त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

# पान १ वरून...

पान १ वरून...

### युरिया खरेदीसाठी सातबारा

प्रयत्न करु. शेतकऱ्याला अडचण येणार नाही याची काळजी घेऊ. खतांच्या बाबतीत काळाबाजार, साठेबाजी होऊ नये, यासाठी हे नवीन ॲप केंद्र सरकारने विकसित केले असल्याचे त्यांनी नमूद केले.

-------------

### काँग्रेसला उशिरा सूचलेले

व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. तसेच शिक्षण आणि भरती प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोपही पक्षाने केला आहे. या आंदोलनाद्वारे काँग्रेस देशभरातील विद्यार्थी, युवक संघटना, शिक्षक आणि परीक्षा घोटाळ्यांचा फटका बसलेल्या तरुणांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करणार आहे. यासाठी सोशल मीडिया मोहीम, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेसमध्ये संपर्क अभियान, थेट संवाद कार्यक्रम आणि विविध जनजागृती उपक्रम राबवले जाणार आहेत. राहुल गांधी यापूर्वीही नीट परीक्षेच्या विकेंद्रीकरणाची मागणी करत आले आहेत. तसेच परीक्षा शुल्क रद्द करणे, पेपरफुटी रॅकेटविरोधात कठोर कारवाई करणे आणि या प्रकरणांसाठी जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. काँग्रेसचे म्हणणे आहे की, तरुणांच्या आशा-आकांक्षांशी तडजोड होऊ नये आणि त्यांना न्याय मिळावा, यासाठी हे आंदोलन उभारले जात आहे. आगामी काळात संसदेतही विद्यार्थी आणि बेरोजगारांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्याची मागणी काँग्रेसकडून करण्यात येणार आहे. देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित असलेल्या या प्रश्नांवर राहुल गांधी पुन्हा एकदा रस्त्यावर उतरल्याने येत्या काही आठवड्यांत या आंदोलनाकडे राजकीय आणि सामाजिक वर्तुळाचे लक्ष असणार आहे.

-------------

### कॉकरोच जनता पार्टीचे

यांच्याशी या संदर्भात चर्चा झाली असून ते सुद्धा सहभागी होणार आहेत. आयोजकांच्या दाव्यानुसार, संविधान चौक येथे सुमारे दोन हजार नागरिक आणि युवक आंदोलनात सहभागी होऊ शकतात. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही युवकांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. परवानगी मिळाल्यास नागपुरातील हे कॉकरोच जनता पार्टीचे दुसरे आंदोलन ठरणार आहे. यापूर्वी ६ जून रोजी पक्षाने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी नागपुरात आंदोलन केले होते. दरम्यान, सीताबर्डी पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुहास राऊत यांनी सांगितले की, आंदोलनासाठीचा अर्ज प्राप्त झाला आहे. यासंदर्भात पोलिस उपायुक्त अन्नपूर्णा सिंह तसेच अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा सुरू आहे. आयोजकांकडून आवश्यक माहितीही मागविण्यात आली असून, सर्व बाबींची पडताळणी केल्यानंतर नियम व अटींनुसार आंदोलनाला परवानगी द्यायची की नाही, याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

-------------

### बेकायदेशीर घुसखोरीवर केंद्र

मूल्यमापन करण्यासाठी २६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती प्रकाश प्रभाकर नावलेकर यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. ही समिती देशभरात वेगाने बदलत असलेल्या लोकसंख्येच्या रचनेचा, तिच्या कारणांचा आणि त्याचे देशाच्या सुरक्षेवर होणार्या परिणामांचा शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास करुन उपाय सुचवणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील वर्षीच्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात देशातील काही विशिष्ट भागांमध्ये अनैसर्गिकरीत्या लोकसंख्येचा समतोल बिघडत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली होती. बेकायदेशीर घुसखोरी आणि इतर कारणांमुळे होणारे अनैसर्गिक लोकसंख्याशास्त्रीय बदल हे कोणत्याही राष्ट्राच्या वर्तमान आणि भविष्यासाठी अत्यंत मोठे आव्हान ठरतात. येणाऱ्या काळात भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमांवर घुसखोरी पूर्णपणे रोखण्यासाठी आणि सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यासाठी 'स्मार्ट सिक्युरिटी ग्रिड' उभारली जाणार आहे. केंद्र सरकारच्या समितीचा अहवाल सादर झाल्यानंतर 'डिटेक्ट, डिलीट आणि डिपोर्ट' म्हणजेच घुसखोरांना शोधणे, त्यांची नावे मतदार यादीतून आणि सरकारी लाभांमधून वगळणे आणि शेवटी त्यांना त्यांच्या मूळ देशात परत पाठवणे या त्रिसूत्रीवर आधारित कायदेशीर कारवाई अधिक वेगाने सुरू होईल.

-------------

### रोहित पवारांची प्रकृती

जात नाहीत आणि सर्व शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही,'' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, शनिवारी करण्यात आलेल्या वैद्यकीय तपासणीत त्यांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण सकाळच्या तुलनेत कमी झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यामुळे त्यांना अशक्तपणा जाणवत असून तब्येतीत चढ-उतार होत असल्याचे निदर्शनास आले आहे. डॉक्टरांच्या माहितीनुसार, रोहित पवार यांचा रक्तदाब सध्या नियंत्रणात असून तो चिंताजनक पातळीवर नाही. मात्र रक्तातील साखर कमी झाल्यामुळे त्यांच्या शरीरात मोठ्या प्रमाणात अशक्तपणा जाणवत आहे. वैद्यकीय पथकाने त्यांना तातडीने विश्रांती घेण्याचा सल्ला दिला असून शरीरातील पाण्याचे आणि साखरेचे प्रमाण संतुलित ठेवण्यासाठी ओआरएस घेण्यास तसेच आवश्यक असल्यास सलाईन लावण्याची शिफारस केली आहे. रोहित पवार यांच्या प्रकृतीबाबत त्यांच्या समर्थकांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून आंदोलनस्थळी कार्यकर्त्यांची गर्दी वाढत आहे. त्यांच्या प्रकृतीवर डॉक्टरांचे पथक सातत्याने लक्ष ठेवून आहे.

-------------

### मान्सून १८ जून

मान्सून अडखळला आहे.हवेचे दाब,वाऱ्यांची दिशा सध्या अनुकूल नाही.तसेच उष्ण वाऱ्यांनी हवेतील बाष्प शोषून घेतल्याने हा परिणाम झाला असल्याचे शास्त्रज्ञांचे मत आहे.त्यामुळे राज्यातील पावसाचे अलर्ट पूर्ण क्षीण झाले आहेत. राज्यातील मॉन्सूनचा प्रवास सलग ६ व्या दिवशी रेंगाळलेलाच होता. देशाच्या इतर भागातही मॉन्सूनने प्रगती केली नाही. पुढील ५ दिवसांमध्ये राज्यातील अनके भागात पावसाचा तर काही भागात उष्णतेच्या लाटेचा अंदाज देण्यात आला आहे. देशातील काही भागात मॉन्सूनच्या वाटचालीसाठी पोषक हवामान आहे. पुढील २ ते ३ दिवसांमध्ये मॉन्सून कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेशचा उरलेला भाग व्यापण्याची शक्यता आहे. तर ओडिशा आणि छत्तीसगडच्या आणखी काही भागात मॉन्सून पुढे सरकण्यासाठी पोषक हवामान असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि.१४ जून २०२६


## थोडक्यात

### माजलगाव शहरातील मुख्य रस्ता व बायपास रस्ता अतिक्रमण मुक्त करा –अ‍ॅड. डोंगरे

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील मुख्य रस्ता, बायपास रस्ता व त्यास जोडून असलेली मार्ग वितरकेवर माजलगाव शहारातील मोठ मोठ्या व छोट्या व्यापारी दुकानदारांनी अतिक्रमण करून शहरातील मुख्य रस्ता व बायपास रस्ता अतिक्रमण करून व्यापून टाकलेला रस्ता अतिक्रमण मुक्त करावा असे निवेदन बहुजन समाज पार्टी चे बीड जिल्हा प्रभारी अँड. अमोल डोंगरे यांनी उपविभागीय अधिकारी व मुख्याधिकारी नगर परिषद माजलगाव यांना दिले आहे.

असे की, माजलगाव शहरात प्रवेश करण्यासाठी पुर्व दिशेने सिंधफना नदिमार्ग व केसापुरी कँम्प कडू येणारा पश्चिम दिशा मार्ग असा एक प्रमुख रस्ता आहे तर दुसरा रस्ता शहराच्या बाहेरून येणारा बायपास रस्ता आहे असे प्रमुख दोन रस्ते आहेत या रस्त्यांना दोन्ही बाजुने मार्ग वितरीका आहेत. या रस्त्याच्या लगत मोठ – मोठी शॉपिंग दुकाने, बँका, दवाखाणे उभारलेले आहेत. त्या शॉपींग दुकान,,बँक, हॉटेल,चालकांनी आपल्या दुकानात येणाऱ्या ग्राहकास चार चाकी, दुचाकी वाहने उभी करण्यासाठी वाहनतळाची व्यवस्था केली नसल्यामुळे खरेदीसाठी येणारे ग्राहक हे शहरात असलेला दुतर्फा मुख्य रस्ता दोन पदरी आहे. दोन्ही बाजुच्या एक पदरी रस्त्यावर चार चाकी, दुचाकी वाहने बेकायदा उभी करून पूर्णतः अतिक्रमण करून कायम व्यापलेला असतो रस्त्यालगत असलेली मार्गवितरिकेवर दुकानाचे जाहिरात फलक लावले असल्याने शहरात येणारे चार चाकीवाहन,दुचाकीस्वार, पादचारी, वृद्ध,महिला, विद्यार्थ्यांना कमालीची कसरत करावी लागते त्याच मुख्य रस्त्यावर फळवाल्यांचे गाडे, चना फुटाणावाल्यांचे गाडे, चिकन सेंटर, चायनिज सेंटर, आईस्क्रिम गाडे, तसेच भाड्याने दिली जाणारी चार चाकी वाहने, माल वाहतुक करणारी वाहने, ट्रॅव्हल्स बेकायदेशीर दिवस – दिवसभर उभ्या केल्या जातात त्यामुळे मुख्य रस्यावरील दोन्ही बाजुचा एकपदरी रस्ता व मार्ग वितरीकावर अतिक्रम केल्यामुळे नागरिकांना आपला जिवमुठीत धरून चालावे लागते. तर छत्रपती संभाजी महाराज चौकातील सुखसागर हॉटेल, शुभम वडापाव, राजमुद्रा चहा हॉटेल, पंढरी चहा हॉटेल आणि बायपास रोडवरील उभारलेले दवाखाने या दवाखाण्यात इलाजासाठी येणारांची वाहणे रस्त्यातच उभी करून रस्ता जाम होत असल्याने नागरीकांचा गर्दितून मार्ग काढतांना छळ होत आहे. या बायपास रोडवरती नेहमी अपघात होत आले आहेत. यापुर्वी एक भिषण अपघात झाला होता. त्या भीषण अपघातात शालेय विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झालेला आहे. तरी माजलगाव शहरातील मुख्य रस्त्यावरील बेकायदा झालेले अतिक्रमण हटवून शहरवासियांना रस्ता सुरळीत कारन न्याय द्यावा. अन्यथा उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी नगर परिषद, माजलगाव यांचे विरोधात लोकशाही मार्गाने बहुजन समाज पार्टी, माजलगाव यांच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे अँड. अमोल डोंगरे यांनी दिला आहे.

### जिरेवाडीत अज्ञातांकडून कथित जादूटोण्याचे प्रकार; कुटुंबात भीतीचे वातावरण

बीड । प्रतिनिधी



तालुक्यातील जिरेवाडी येथे एका कुटुंबाच्या मालकीच्या जागेत अज्ञात व्यक्तीकडून वारंवार कथित जादूटोणा केल्याचे साहित्य टाकले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे संबंधित कुटुंबामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून परिसरातही चर्चेला उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जिरेवाडी येथील महादेव निर्धार यांच्या जागेत दर आठवड्याला लाल कापडात बांधलेले गाठोडे, दोरे व इतर संशयास्पद साहित्य आढळून येत होते. हा प्रकार सातत्याने घडत असल्याने कुटुंबीय मानसिक तणावाखाली होते. अखेर मित्रमंडळींसह जागेची पाहणी करून ते साहित्य हटविण्यात आले व नष्ट करण्यात आले. स्थानिकांच्या मते, अशा प्रकारांमागे अंधश्रद्धा पसरविणे, भीती निर्माण करणे अथवा वैयक्तिक द्वेषातून त्रास देण्याचा उद्देश असू शकतो. मात्र अशा कृत्यांमुळे सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम व असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. याप्रकरणी संबंधित व्यक्तींचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी परिसरातून होत आहे. नागरिकांनी अशा प्रकारांना बळी न पडता कायद्याची मदत घ्यावी तसेच संशयास्पद हालचाली दिसून आल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहनही करण्यात येत आहे.

# मृग नक्षत्र अर्धे संपले तरी उन्हाचा प्रभाव कायम!

## दिवस पावसाळ्याचे, चित्र अजूनही उन्हाळ्याचे; शेतकऱ्यांच्या डोक्यावर चिंतेचे ढग

शिरूर । प्रतिनिधी

मृग नक्षत्र लागून आठ दिवस झाले तरी वरुण राजा मेहरबान झाला नसल्याने शिरूर तालुक्यामध्ये तीव्र उन्हामुळे अद्याप तरी दिवस पावसाळ्याचे, चित्र मात्र उन्हाळ्याचेच पाहायला मिळत आहे.

एप्रिल– मे महिन्यामध्ये लग्नसराई संपली की, बळीराजा आपला मोर्चा शेतीच्या पूर्वमशागतिकडे वळत असतो. रोहिणी नक्षत्रामध्ये म्हणजेच मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत दरवर्षी मानसून पूर्व काही ना काही प्रमाणात पाऊस बरसत असतो. मात्र यावर्षी अजून ना मान्सून आला, मान्सून पूर्व बरसला यामुळे शेतीच्या कामाला पूर्तीची खिळ बसली आहे. शेतातील नांगरट केल्यानंतर एखादा– दुसरा पाऊस पडल्यानंतर शेतकरी शेतामध्ये, मोघडणी वखरणी, पाळी टाकण्याचे कामे करून मृग नक्षत्र लागण्यापूर्वीच खरीप हंगामाच्या पेरणीसाठी सज्ज झालेला असतो. मात्र यावर्षी अद्याप तरी शिरूर कासार तालुक्यामध्येच काय मराठवाड्यामध्येच वरुण राजाने आपली मेहरबानी दाखवली नाही परिणामी पावसाअभावी खरीप हंगामाच्या पेरणी लांबण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिरूर कासार तालुक्यामध्ये यावर्षी मे महिन्यातील अधिकच्या तापमानामुळे शेतीला वाळवंटाचे स्वरूप प्राप्त झाल्याचे चित्र





पाहायला मिळत आहे.

शिरूर तालुक्यात पावसाविना पेरणी लांबणीवर पडण्याच्या मार्गांवर

मृग नक्षत्रामध्ये खरीपाची पेरणी झाली म्हणजे पिके जोमाने येतात आणि उत्पादनाला उतारही चांगला मिळतो. असा शेतकऱ्यांचा वर्षानुवर्षाचा अनुभव आहे. यामुळे ऊनतहाणेची पर्वा न करता शेतकरी खरीप हंगामासाठी पूर्वमशागत जोमाने करत असतो. याही वर्षी जिल्ह्यातील वाढत्या तापमानातही शेतकऱ्यांनी शेतातील कामे उरकून घेण्याचा प्रयत्न देखील केला आहे. मात्र यावर्षी अद्याप तरी पावसाच्या सरी कोठेच न पावसाविना पेरणी लांबणीवर पडण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. तर वेळेवर पाऊस जर नाही पडला शिरूर कासार तालुक्यामध्ये पाणीटंचाईला सामोरे जाण्याची वेळ येणार असल्याचे बोलले जात आहे.

# फॉरेन्सिक सायन्स शिक्षणासाठी तवलवाडीच्या प्रशांत जगतापची निवड

## बीड जिल्ह्यातून एकमेव विद्यार्थ्याचा मान; राज्यातील अवघ्या ६० जागांमध्ये मिळवले स्थान

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील तवलवाडी येथील होतकरू विद्यार्थी प्रशांत रवींद्र जगताप याची मुंबई येथील होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी अंतर्गत चालणाऱ्या प्रतिष्ठित फॉरेन्सिक सायन्स अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. राज्यभरातून अत्यंत मर्यादित प्रवेश असलेल्या या अभ्यासक्रमासाठी निवड झालेला तो बीड जिल्ह्यातील एकमेव विद्यार्थी ठरला असून त्याच्या या यशामुळे तवलवाडीसह संपूर्ण आष्टी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

बारावीनंतर प्रवेश मिळणारा हा तीन वर्षांचा विशेष अभ्यासक्रम राज्यातील केवळ तीन महाविद्यालयांमध्ये उपलब्ध आहे. या अभ्यासक्रमासाठी दरवर्षी अवघ्या ६० विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जातो. अशा कठीण स्पर्धेत प्रशांत जगताप याने आपले स्थान निश्चित करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

फॉरेन्सिक सायन्स हे आधुनिक गुन्हे अन्वेषण क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचे आणि भविष्यकालीन संधी उपलब्ध करून देणारे शिक्षण मानले जाते. खून, अपघात, विषबाधा, रक्तनमुने, डीएनए तपासणी तसेच विविध गुन्ह्यांच्या वैज्ञानिक तपासामध्ये फॉरेन्सिक तज्ज्ञांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना सीबीआय, सीआयडी, राज्य व केंद्रीय फॉरेन्सिक प्रयोगशाळा तसेच विविध तपास यंत्रणांमध्ये करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध होतात.

प्रशांत जगताप याने इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण तवलवाडी येथील पंडित नेहरू विद्यालयात पूर्ण केले. त्यानंतर अकरावी व बारावीचे शिक्षण निवृत्तीराव उच्च माध्यमिक विद्यालय, जामगाव येथे घेतले. शैक्षणिक वाटचालीत सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि अभ्यासातील चिकाटीच्या जोरावर त्याने हे यश मिळवले आहे. आता तो मुंबई येथील होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटीमध्ये फॉरेन्सिक सायन्सचे उच्च शिक्षण घेणार आहे. प्रशांत जगताप यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आष्टी येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. राजेंद्र जरांगे, तवलवाडीचे सरपंच हिराभाऊ केरूळकर, उमेश जगताप, राहुल जगताप, किशोर जगताप, चेअरमन डॉ. चंद्रकांत ढेरे, गोकुळ कोकणे, डॉ. प्रकाश चटाले, हरिभाऊ पोकळे, नानासाहेब काकडे, सतीश कोकणे, राजेंद्र कोकणे, उद्धव कोंडे, संदीप जगताप आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्याचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

भविष्यकाळात तपास यंत्रणांमध्ये काम करण्याची संधी

फॉरेन्सिक सायन्स हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि गुन्हे तपास यांचा संगम असलेले क्षेत्र असून या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना आधुनिक तपास पद्धती, पुरावे संकलन, डीएनए विश्लेषण, रासायनिक तपासणी, डिजिटल फॉरेन्सिक यांसारख्या विषयांचे सखोल प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर करिअरच्या व्यापक संधी उपलब्ध होत आहेत. प्रशांत जगताप याच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला असून मेहनत, जिद्द आणि योग्य दिशेने केलेले प्रयत्न यामुळे कोणतेही ध्येय गाठता येते, हे त्याने सिद्ध करून दाखवले आहे.

## पान ६ वरुन...

### तर सोमवारी बीडमध्ये

युवा कार्यकर्ते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक धनंजय गुंदेकर यांनीही त्यांच्या संघटनेच्या वतीने जाहीर पाठिंबा दिला. शेतकऱ्यांना समान न्याय देण्यासाठी चालू असलेल्या या आंदोलनाला शासनाने प्रतिसाद दिला नाही, जाचक अटी रद्द केल्या नाही तर सोमवारी बीड येथे शेतकरी बांधवासह आंदोलन करणार असल्याची माहिती यावेळी श्री राजेंद्र मस्के यांनी आमदार रोहित दादा पवार यांना दिली आहे. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस केज तालुका अध्यक्ष शंकर जाधव,महेश सावंत, ग्रामपंचायत सदस्य अनिल शेळके, सरपंच नितीन खांडे आदी सहभागी झाले होते.

अन्नदाता वाचला तरच देश वाचेल!

शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी सुरू असलेल्या या संघर्षात आपण सर्वांनी सहभागी होऊन आवाज बुलंद करूया.

### सज्ज व्हा ! मशाल हातात घ्या

तुटला नाही कारण आपली निष्ठा व्यक्तीला नाही तर विचारला आहे या बैठकीस शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, गणेश वरेकर, पदवीधर मतदार नोंदणी समन्वयक दिलीप घुगे, परमेश्वर सातपुते, माजी जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे, जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार, जिल्हा संघटक रतन गुजर, नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख हनुमंत जगताप, आशिष मस्के, आदिनाथ खेडकर, रामराजे साळुंखे तालुका प्रमुख अजय दाभाडे, सोपान मोरे, विनायक मुळे, सुभाष राऊत, मुकुंद शिंदे, भोजराज पालीवाल, अशोक जाधव, शहर प्रमुख, राजेश विभुते, दत्ता रांजवण, तात्या रोडे श्रीधर गरड हरिमामा खेडकर, इत्यादी सह जिल्ह्यातील असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

### परळीतून ५ कोटींच्या खंडणीसाठी

स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी परळी ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन केले होते. उर्वरित आरोपी परराज्यात पळून गेल्याची माहिती मिळाल्याने पोलिसांच्या पथकाने नागपूर, मध्य प्रदेश, राजस्थान आणि दिल्ली येथे त्यांचा शोध घेतला. अखेर परळी ग्रामीण पोलिसांनी सचिन नारायण वंजारे, अल्केश अवजाडे आणि शुभम पिंपळकर या तिघांनाही अटक केली आहे.

**या पथकाने केली कामगिरी**

सदरची धडक कामगिरी प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. ऋषीकेश शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि शिवाजी बंटेवाड, परळी ग्रामीणचे पोनि मझरअली सय्यद, पोउपनि सुशांत सुतळे, पोलीस अंमलदार मारुती कांबळे, सचिन सानप, रामचंद्र केकान, गोविंद भताने, सचिन आंधळे, विकी सुरवसे आणि आसेफ शेख यांच्या पथकाने केली आहे. या कामगिरीबद्दल पोलीस दलाचे कौतुक होत आहे.

### महाराष्ट्र वक्फ बोर्डाचे अध्यक्ष

संरक्षणासाठी राज्य सरकारने मुस्लिम संरक्षण कायदा करावा, अशी मागणी त्यांनी केली. तोहिद खान हत्याकांड प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआईटी गठित करण्यात यावी म्हणून येत्या मान्सून अधिवेशनामध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद फडणवीस, गृहमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना लवकरच एक शिषमंडळ भेटणार असल्याचे समीर काझी यांनी यावेळी सांगितले. तोहीद खान यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या उज्वल भविष्यासाठी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड सर्वतोपरी मदत करण्यास तयार असल्याचेही ते म्हणाले.

# प्राध्यापकांनी संशोधनाकडे गांभीर्याने पाहणे ही काळाची गरज – प्रा. महेंद्र शिरसाट

## तुलसी शैक्षणिक समूहात सेवापूर्ती गौरव समारंभ उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी

प्राध्यापकांनी केवळ वर्गात अध्यापन करण्यापुरते मर्यादित न राहता संशोधनाकडे गांभीर्याने पाहणे ही काळाची गरज बनली आहे. संशोधनातूनच नवीन ज्ञानाची निर्मिती होते आणि समाजाच्या प्रगतीला दिशा मिळते, असे मत जेष्ठ प्राध्यापक तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता प्रो. डॉ. महेंद्र शिरसाट यांनी व्यक्त केले.

तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने शनिवार, दि. १३ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या त्यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रदीप रोडे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रो. डॉ. उत्तम साळवे, प्रो. डॉ. मनोहर शिरसाट, प्रा. अर्जुन राठोड यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. महेंद्र शिरसाट म्हणाले की, जीवनात तत्त्वांशी कधीही तडजोड करू नका, महामानवांचे विचार आचरणात आणा आणि समाजासाठी काहीतरी करण्याची जाणीव जपा, आपण ज्या समाजातून घडतो त्या समाजासाठी काहीतरी परत देण्याची भावना प्रत्येकामध्ये असली पाहिजे. असा प्रेरणादायी संदेश देत शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी आई-वडिलांप्रमाणे भूमिका निभावावी, असे ते म्हणाले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ.




मनोहर शिरसाट म्हणाले की, प्रा. डॉ. महेंद्र शिरसाठ यांनी आयुष्यभर तत्त्वांना कधीही सोडले नाही. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्यांनी अध्यापन, संशोधन आणि शैक्षणिक विकासाचे कार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ अनेक विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनाही झाला असून ते शिक्षण क्षेत्रातील प्रेरणेचे महत्त्वपूर्ण स्रोत आहेत.प्रो. डॉ. उत्तम साळवे यांनी आपल्या भाषणात डॉ. शिरसाट यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि कार्याची व्याप्ती अत्यंत व्यापक आहे. देश-विदेशातील अनेक नामांकित पदव्या त्यांनी संपादन केल्या असून त्यांचा परिचयच तब्बल ५५ पानांचा आहे. हे यश मिळवण्यासाठी त्यांनी प्रचंड कष्ट, मेहनत आणि आपले सर्वस्व पणाला लावले आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाज व शिक्षण क्षेत्रासाठी अधिकाधिक योगदान देण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे.अध्यक्षीय समारोपात प्रा. प्रदीप रोडे म्हणाले की, डॉ. महेंद्र शिरसाट यांनी आयुष्यभर प्रामाणिकपणा, तत्त्वनिष्ठा आणि सामाजिक मूल्ये जपत कार्य केले. त्यांनी कधीही शॉर्टकटचा मार्ग स्वीकारला नाही. महामानवांच्या विचारांना कृतीत उतरवत त्यांनी शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांची जडणघडण केली. त्यांच्या कार्यामुळे अनेक गुणवंत विद्यार्थी घडले असून विद्यापीठाच्या नावलौकिकातही भर पडली आहे, असे नमूद केले.या गौरव सोहळ्यास तुलसी शैक्षणिक समूहातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजयकुमार बांदल यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्रा. किशोर वाघमारे यांनी मानले.

# कर्जमाफी व विम्यासाठी शेतकरी नेते भाई थावरे आक्रमक

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची गाडी अडवून दिले निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

सरसकट दोन लाख रुपयांची शेतकरी कर्जमाफी तसेच बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मुख्यमंत्री यांनी जाहीर केल्याप्रमाणे प्रति हेक्टर १७ हजार ५०० रुपयांचा विमा तातडीने देण्यात यावा, या मागण्यांसाठी शेतकरी नेते भाई गंगाधर थावरे यांनी दि २३ जुन शनिवार रोजी माजलगाव दौऱ्यावर आलेले कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांची गाडी अडवून निवेदन सादर केले.



यावेळी थावरे यांनी सांगितले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत अनेक शेतकरी लाभापासून वंचित राहत आहेत. शासन निर्णयातील अटींमुळे यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी कर्जमुक्ती योजना किंवा महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना नव्या योजनेतून वगळण्यात आले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर शेतकरी नाराज असून जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनानुसार सरसकट कर्जमाफीची अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली.अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मुख्यमंत्री यांनी प्रति हेक्टर १७ हजार ५०० रुपयांची मदत देण्याची घोषणा केली होती. मात्र अद्यापही अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर मदतीची रक्कम जमा झालेली नसल्याचा आरोपही थावरे यांनी केला. शासनाने या प्रकरणात तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली.

माजलगाव दौऱ्यावर असताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची गाडी अडवून भाई गंगाधर थावरे यांनी हे निवेदन दिल्याने काही काळ परिसरात चर्चेचे वातावरण निर्माण झाले होते. शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# रोहित पवार यांच्या सरसगट कर्जमुक्ती आंदोलनास किसान संघर्ष समितीचा पाठिंबा –प्रा.मोराळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक १२ जून पासून पंढरपूर येथे शेतकऱ्यांना सरसगट कर्ज माफ करावे या साठी अन्नदात्यासाठी अन्न सत्याग्रह रोहित पवार यांनी सुरू केले आहे. किसान संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष संयुक्त किसान मोर्चाचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. सुनीलम आणि राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. सुशिलाताई मोराळे यांनी पंढरपूर येथे जाऊन आपला सक्रिय पाठिंबा दिला आहे.

देशाच्या दिल्लीच्या बॉर्डरवर ३८० दिवस शेतकरी विरोधी तीन कायदे रद्द करा या मागणीसाठी किसान संघर्ष समिती आणि संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने आंदोलनात सक्रिय भागीदारी करून सरकारला हे तीन शेतकरी विरोधी कायदे रद्द करायला डॉ. सुनीलम आणि देशातील ३०० शेतकरी संघटनांनी भाग पाडले. या लढ्याचा अनुभव डॉक्टर सुनीलम यांनी पंढरपूर येथील उपोषणस्थळी कथन केला.

खरं म्हणजे ही कर्जमाफी पूर्णपणे फसवी असून शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी आहे. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात या कर्जमाफीची तरतूदच नाही आता पुरवणी मागण्यात तरतूद केली जाणार आहे. लाडकी बहीण, शेती कंपनी विज बिल माफ या मत पेटीवर डोळा ठेवून केलेल्या घोषणामुळे सरकारच्या तिजोरीवर ४५




हजार कोटीचा अतिरिक्त बोजा पडत आहेत. या कर्जमाफीमुळे राज्य सरकारवर ३६ हजार ५८८ कोटीचा बोजा पडणार आहे. ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणार असं सरकार सांगत आहे. २ लाख पर्यंतच कर्ज माफ होणार आहे. १६ लाख ७४ हजार शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. ज्याच्याकडे २ लाखापेक्षा जास्त कर्ज आहे त्यांनी वरचे कर्ज भरायला ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत दिली आहे. असे जवळपास २ लाख १० हजार शेतकरी आहेत. जे वरचे कर्ज भरतील त्यांना ५० हजार प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे. असे लाभार्थी १२.७१ लाख आहेत.

२०१९ ला केलेल्या कर्जमाफीचा लाभ ज्यांनी घेतला त्यांना २०२६ ची कर्जमुक्ती मिळणार नाही. नैसर्गिक संकटे कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी कधी अवकाळी मुळे, शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नाही म्हणून कधी नापिकी, निर्यात आयात धरणाचा फटका शेतकऱ्यांना बसतो. मोदींच्या १२ वर्षात १ लाख २५ हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. ही कर्जमाफी पूर्णपणे फसवी व दिशाभूल करणारी आहे, अटी शर्ती घालून केलेली कर्जमाफी मान्य नाही म्हणून रोहित पवार प्राणांतिक उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या या आंदोलनाचा राष्ट्रीय किसान संघर्ष समितीच्या वतीने डॉक्टर सुनीलम आणि प्रा. सुशिलाताई मोराळे यांनी सक्रिय पाठिंबा दिला आहे.

cmyk

# एप्रिलमध्ये अवकाळीत नुकसान भरपाईसाठी १४ कोटी ५८ लाख मंजूर

## ११ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना होणार मदत

मुंबई : एपिल २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी १४ कोटी ५८ लाख ९० हजार रुपये इतका निधी वितरित करण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. एपिल महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे ११ जिल्ह्यांतील १६,२६७ शेतकऱ्यांचे ८,०९८.९५ हेक्टवरील शेतपिकांचे नुकसान झाले होते. त्यांना ही मदत दिली जाणार आहे. हा निधी डीबीटी पोर्टलद्वारे थेट बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वितरित केली जाणार आहे. याबाबतचा शासन निर्णय महसूल व वन विभागाने जारी केला आहे.

एप्रिल महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे पुणे विभागातील सातारा, सोलापूर, पुणे जिल्हा तसेच छत्रपती संभाजीनगर विभागातील नांदेड, धाराशिव, हिंगोली आणि अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम आदी जिल्ह्यांतील शेतपिकांचे नुकसान झाले होते. पुणे विभागात सर्वाधिक ४,३५१ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते. त्यापाठोपाठ अमरावती विभागातील २,१५७ हेक्टर आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील १,५९० हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते. यात मुख्यतः गहू पिकाचे सर्वाधिक नुकसान झाले होते. मका, ज्वारी पिके आडवी





झाली होती. आंबा बागांना फटका बसला होता. तसेच बाजार समित्यांमध्ये ठेवलेला शेतमाल भिजला होता. पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना मृग बहार सन २०२५ मधील राज्याच्या उर्वरीत हिश्श्याचा ११ कोटी ४२ लाख ४२ हजार ९११ रुपये इतका निधी अनुदानापोटी वितरित करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. हा निधी चार विमा कंपन्यांना अदा केला जाणार आहे. याबाबतचा शासन निर्णय कृषी, पशुसंवर्धन विभागाने जारी केला आहे. शेतकऱ्यांच्या फळ पिकांना हवामान धोक्यापासून विमा संरक्षण देऊन, शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्याच्या दृष्टीने मदत व्हावी, यासाठी राज्यात प्राधान्याने पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना राबविण्यात येत आहे. विविध हवामान धोक्यांमुळे, फळपीकांच्या उत्पादकतेवर विपरीत परिणाम होऊन, मोठ्या प्रमाणावर उत्पादनात घट येते. यामुळे पर्यायाने शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन न मिळाल्याने, आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागते. या सर्व बाबींचा विचार करुन, पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना, राज्यात २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षांतील मृग बहारामध्ये संत्रा, मोसंबी, डाळिंब, चिकू, पेरू, लिंबू, सिताफळ व द्राक्ष या ८ फळपिकांसाठी राबविण्यात येते. त्यासाठी २६ जिल्ह्यांमध्ये महसूल मंडळ हा घटक धरुन भारतीय कृषी विमा कंपनी, बजाज जनरल इन्शुरन्स, जनरली सेंट्रल इन्शुरन्स कंपनी आणि युनिव्हर्सल सॉम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी आदी विमा कंपन्यांमार्फत राबविण्यात येत आहे.

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत मृग बहार २०२५ अंतर्गत उर्वरीत राज्य हिस्सा अनुदानाकरीता, कृषी आयुक्तालयाने विमा कंपन्यांना ११ कोटी ४२ लाख रुपये इतका निधी वितरीत करण्याची विनंती केली होती. त्यानुसार हा निधी या योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित विमा कंपन्यांना अदा करण्यासाठी योजनेच्या बँक खात्यामध्ये उपलब्ध करून देण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

# पावसाळ्यात जनावरांचा गोठा असा ठेवा स्वच्छ



सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू झाले असून जनावरांसाठी योग्य निवाऱ्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. यासाठी घराला लागून जनावरांचा गोठा सुस्थितीत करून घेतला जातो. कुठे पाणी गळतंय का? जमिनीवर मुरूम टाकून सपाट करणे असो, ही कामे केली जातात. जनावरांचा गोठा व्यवस्थापनाचा दूध उत्पादनावर सुद्धा परिणाम होतो. जनावरांना पावसाळ्यात सुरक्षित आणि उबदार जागा मिळणे गरजेचे आहे.

पावसाळ्यात गोठ्याचे व्यवस्थापन : गोठ्यामध्ये पाणी गळत असेल तर वेळीच डागडुजी करावी. गोठ्यात हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. गोठ्यामध्ये स्वच्छता ठेवावी, जेणेकरून लघवी व शेणावाटे निघणारे अमोनिया मिथेन वायूमुळे जनावरांच्या डोळ्यांना त्रास होणार नाही. वारा, थंडीपासून बचाव करण्यासाठी योग्य निवारा असावा. गाभण गाई, म्हशींची योग्य व्यवस्था करावी. त्यांना बसण्यासाठी आरामदायी व उबदार जागा असावी. शक्य तेवढे कोरडे वातावरण या काळात ठेवावे. पावसाळ्यात जमीन ओली, भुसभुशीत झाल्यामुळे जनावर घसरून त्यांना इजा होऊ शकते त्यामुळे वेळोवेळी जमीन कोरडी होईल याची काळजी घ्यावी. दगड व माती खुरांमध्ये जाऊन बसल्यामुळे जनावरांना जखमा होतात. यासाठी खुरांची नियमित तपासणी करावी. पावसाळ्यात ओलसरपणामुळे खूर खराब झाल्यास त्या वेदनांमुळे दुभत्या गाई, म्हशींच्या उत्पादनावर परिणाम होतो. हिरव्या चाऱ्याकरिता ज्वारी, बाजरी, मका, यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याचबरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये यशवंत, मेथीघास यासारखी पिके घ्यावीत. पावसाळ्यामध्ये पश्चिमेकडून पाऊस व वारा वाहतो, त्यानुसार शेळ्यांचे पावसापासून संरक्षण होण्यासाठी गोठ्यात आवश्यक त्या उपाययोजना कराव्या. शेळ्यांना ठेवण्यासाठी वेगवेगळी दालने असावी ज्यामुळे आजारी शेळ्या, पिले, गाभण शेळ्या व बोकड वेगवेगळे ठेवता येतील. शेळ्यांना आवश्यक तेवढी जागा द्यावी, जेणेकरून गर्दी होणार नाही. पावसाळ्यात शेळ्यांच्या शेडच्या प्रवेशद्वाराजवळ चुना टाकावा, तसेच शेडमधील जमिनीवरही चुना भुरभुरावा.

# मोसंबी बागेतील फळगळीची कारणे



जेव्हापासून झाडाला फळधारणा होते तेव्हापासून ते फळ काढणीचा कालावधी पर्यंत अनेक कारणांमुळे फळगळीची समस्या निर्माण होते. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यामध्ये होणारी फळगळ अधिक तीव्र स्वरूपाचे असते व जास्त नुकसानकारक ठरू शकते. कारण या कालावधीमध्ये फळे मोठ्या आकाराची झालेले असतात. यासाठी अनेक नैसर्गिक कारणे तसेच, विविध प्रकारचे रोग व फळमाशी तसेच रसशोषण करणाऱ्या पतंगामुळे अर्धी कच्ची फळे पिवळी पडतात व गळून पडतात. परंतु काही विशिष्ट कालखंडामध्ये ही समस्या फार तीव्र स्वरूप धारण करते.

मोसंबी बागेतील फुले आणि फळगळीची कारणे

फळ झाडावर जेव्हा फुलांची निर्मिती होते त्यानंतर ती उमलत असताना गळ होते. तसेच पंधरा ते पंचवीस दिवसानंतर दुसरी फुलगळ होते. फळधारणा झालेनंतर लहान फळेदेखील गळून पडतात. बोराच्या आकाराचे व त्यापेक्षा मोठी झाल्यानंतर पक्व होईपर्यंत वाढ झालेली फळेदेखील गळून मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असते. बऱ्याचदा वाढ झालेल्या फळांमध्ये इथीलीन तयार झाल्यामुळे फळगळीची समस्या उद्भवते. त्यासोबतच रोगग्रस्त झाडे, किडींचा प्रादुर्भाव किंवा दुखापत झालेली व अधिक वयाची झाडे देखील याला बळी पडतात. तसेच कर्ब आणि नत्र यामधील गुणोत्तर यामध्ये असंतुलन झाल्यामुळे देखील ही समस्या उद्भवते. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता राहिली तर पोषक तत्वे योग्य प्रमाणात न मिळाल्यामुळे देखील झाडाची उपासमार होते व फळगळीची समस्या निर्माण होते. बऱ्याचदा काही कारणास्तव जर पाण्याचा ताण पडला किंवा पाणी जास्त प्रमाणात दिले गेले तरीसुद्धा ही समस्या उद्भवते. बऱ्याचदा तापमानामध्ये अचानक बदल होतो व याचा परिणाम फळांची गळ होण्यावर होतो. पाणी व्यवस्थापन जरी चुकले तरी सुद्धा ही समस्या उद्भवते. बऱ्याचदा कमी किंवा अधिक पाण्यामुळे फळझाडांना ताण बसतो व गळ होते. त्यामुळे संतुलित पद्धतीने पाण्याचा वापर करणे गरजेचे आहे. जर आपण मोसंबी पिकांमधील आंबिया बहराची फळगळ होण्याचा विचार केला तर रसशोषण करणाऱ्या पतंगा मुळे ही फळगळ होत असते. या किडीचे प्रौढ पतंग संध्याकाळी सात ते नऊ या वेळ दरम्यान फळावर बसून सोंड फळांमध्ये खूपसतात व रस शोषण करतात व त्यामुळे गळ होते.

# पीक फेरपालट शेती आणि शेतकऱ्यांसाठी महत्वाचेच



खरीप हंगामाची चाहूल लागताच शेतकरी पीक नियोजनाच्या तयारीला लागले आहेत. मात्र, वर्षानुवर्षे एकाच जमिनीत एकाच प्रकारचे पीक घेण्याची पद्धत आता शेतकऱ्यांसाठी धोकादायक ठरत असल्याचे मृदा परीक्षण अहवालातून समोर आले आहे. सलग एकाच पिकाची लागवड केल्याने जमिनीतील अन्नद्रव्यांचे संतुलन बिघडत असून सुपीकता कमी होत आहे. परिणामी उत्पादन घटणे, रोग-किडींचा प्रादुर्भाव वाढणे आणि शेतीचा खर्च वाढणे अशा समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे.

बहुतांश शेतकरी सोयाबीन, कापूस आणि तूर या पारंपरिक पिकांवर भर देतात. मात्र, दीर्घकाळ एकाच पिकाची पुनरावृत्ती केल्यास मातीतील नत्र, स्फुरद, पालाश यांसारखी आवश्यक अन्नद्रव्ये झपाट्याने कमी होतात. त्यामुळे पीक उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होऊ लागतो. कृषी विभागाकडून करण्यात आलेल्या माती परीक्षण अहवालांमध्ये अनेक शेतजमिनींमध्ये अन्नद्रव्यांची कमतरता आढळून आली आहे. सतत एकाच पिकाची लागवड झाल्याने जमिनीचा पोत खालावत असून सेंद्रिय घटकांचे प्रमाणही कमी होत असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. तज्ज्ञांच्या मते, जमिनीची उत्पादकता टिकवून ठेवण्यासाठी पीक फेरपालट करणे अत्यावश्यक बनले आहे. अन्यथा भविष्यात नापिकी आणि उत्पादन घट यासारख्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागू शकते.

एकाच पिकामुळे रोगांचा धोका :सलग एकाच पिकाची लागवड केल्यामुळे विशिष्ट रोग आणि किडींना पोषक वातावरण तयार होते. अन्नद्रव्यांचा असमतोल निर्माण झाल्यास मुळकूज, खोडकूज, शेंडाकूज यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता अधिक असते. यामुळे कीटकनाशके आणि बुरशीनाशकांवरचा खर्च वाढतो. परिणामी उत्पादन खर्च वाढून शेतीची आर्थिक गणिते बिघडू शकतात.पीक फेरपालट का आवश्यक?कृषी तज्ज्ञांच्या मते, एका हंगामात तेलबिया किंवा नगदी पीक घेतल्यानंतर पुढील हंगामात डाळवर्गीय किंवा धान्य पिकांचा समावेश करणे फायदेशीर ठरते. यामुळे जमिनीतील पोषण संतुलन राखले जाते आणि सुपीकता टिकून राहते. उदाहरणार्थ, सोयाबीननंतर हरभरा, मूग, उडीद किंवा इतर डाळवर्गीय पिके घेतल्यास जमिनीतील नत्राचे प्रमाण वाढण्यास मदत होते. त्यामुळे पुढील पिकासाठी आवश्यक पोषण उपलब्ध होते.

पीक फेरपालटाचे फायदे :जमिनीतील नत्र, स्फुरद आणि पालाश यांचे संतुलन राखले जाते. रोग व किडींचा प्रादुर्भाव कमी होतो. मातीचा पोत सुधारतो आणि सेंद्रिय कर्ब टिकून राहतो. रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होते. कमी खर्चात अधिक उत्पादन मिळण्यास मदत होते. जमिनीची दीर्घकालीन उत्पादकता वाढते.

पीक फेरपालट आवश्यक : पीक फेरपालट ही केवळ शिफारस नसून मातीच्या आरोग्याची आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची सुरक्षा आहे. सातत्याने एकच पीक घेतल्यास जमीनही थकते. त्यामुळे पीक फेरपालटाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. मृदा परीक्षणाच्या आधारे पीक नियोजन आणि फेरपालट केल्यास उत्पादनात स्थिरता येते. तसेच अन्नद्रव्यांचे संतुलन राखून जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकवून ठेवता येते.

खरीप हंगामाच्या नियोजनावेळी केवळ बाजारभावाचा विचार न करता जमिनीचे आरोग्य लक्षात घेणे आवश्यक आहे. पीक फेरपालट, सेंद्रिय खतांचा वापर आणि मृदा परीक्षणाच्या आधारे शेती केल्यास उत्पादन वाढीसह जमिनीची सुपीकताही टिकवून ठेवता येईल. अन्यथा आजचा एकाच पिकाचा हट्ट भविष्यात मोठ्या आर्थिक नुकसानीचे कारण ठरू शकतो.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

११५८ : इसार नदीच्या काठावर म्यूनिच शहर स्थापन केले.
१७०४ : मुघलांच्या कैदेत असलेल्या संभाजीराजे यांच्या मुलाचे औरंगजेबाने लग्न लावून दिले.
१७७५ : अमेरिकन सैन्य दलाची स्थापना करण्यात आली.
१७७७ : अमेरिकेने 'स्टार्स अँड स्ट्राइप्स' या ध्वजाचा स्वीकार केला.
१७८९ : मक्यापासुन पहिल्यांदाच 'व्हिस्की' तयार करण्यात आली. तिला 'बोर्बोन' असे नाव देण्यात आले कारण तयार करणारा रेव्हरंड क्रेग हा केंटुकी प्रांतातील 'बोर्बोन' येथील रहिवासी होता.
१८९६ : महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी 'अनाथ बालिकाश्रम' ही संस्था स्थापन केली. यातुनच पुढे कर्वे स्त्री शिक्षण संस्था, एस. एन. डी. टी. विद्यापीठ असे मोठमोठे उपक्रम सुरू झाले.
१९०१ : पहिल्यांदा गोल्फ खेळाची प्रतियोगिता अमेरिकेत आयोजित करण्यात आली.
१९०७ : नॉर्वेत स्त्रियांना मतदानाचा अधिकार.
१९२६ : ब्राझील लीग ऑफ नेशन्समधून बाहेर.
१९३४ : ऑस्ट्रिया देशाची राजधानी वियना येथे जर्मन शासक हिटलर आणि मुसोलिनी यांची भेट झाली.
१९३८ : सुपरमॅनची चित्रपट कथा पहिल्यांदा प्रकाशित.
१९४० : जर्मनीने पॅरिस ताब्यात घेतल्यामुळे दोस्त राष्ट्रांनी तिथुन माघार घेतली.
१९४५ : भारताला स्वायत्तता देण्यासंबंधीची वेव्हेल योजना जाहीर
१९५२ : अमेरिकेने अणुशक्तीवर चालणारी पहिली पाणबुडी यू. एस. एस. नॉटिलस बांधण्यास सुरुवात केली.
१९६२ : पॅरिसमध्ये युरोपियन अंतराळ संशोधन संस्था स्थापन झाली नंतर युरोपियन स्पेस एजंसी बनली.
१९६७ : चीनने पहिल्या 'हायड्रोजन बॉम्ब' ची चाचणी केली.
१९६७ : मरिनर अंतराळ यान शुक्राकडे प्रक्षेपित.
१९७२ : डी. डी. टी. या कीटकनाशकाच्या वापरावर अमेरिकेत बंदी घालण्यात आली.
१९९९ : दक्षिण आफ्रिकेचे पहिले श्वेतवर्णीय राष्ट्राध्यक्ष नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला यांचा कार्यकाळ संपला.
२००१ : ए. सी. किंवा डी. सी. यापैकी कोणत्याही विद्युतप्रवाहावर चालणार्या उपनगरी गाडीचा शुभारंभ पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक वासुदेव गुप्ता यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३९८ : संत कबीर.
१४४४ : भारतीय खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ निळकंथा सोमायाजी यांचा जन्म.
१७३६ : चार्ल्स कुलोम फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ ऑगस्ट १८०६)
१८६४ : अलॉइस अल्झायमर जर्मन मेंदुविकारतज्ञ (मृत्यू: १९ डिसेंबर १९१५)
१८६८ : कार्ल लॅन्ड्स्टायनर नोबेल पारितोषिक विजेते ऑस्ट्रियन जीवशास्त्रज्ञ (मृत्यू: २६ जून १९४३)
१८९९ : महावीर चक्र सन्मानित माजी भारतीय सैन्य अधिकारी ब्रिगेडियर राजिंदर सिंह यांचा जन्मदिन.
१९०० : भारतीय निबंध लेखक आणि मल्याळम साहित्यांचे साहित्यिक समीक्षक कारिककट्ट मराठू कुट्टिकृष्ण मरार यांचा जन्मदिन.
१९१६ : माजी भारतीय लष्कर प्रमुख अधिकारी दिवान प्रेम चंद यांचा जन्मदिन.
१९२० : प्रख्यात जैन धर्मीय स्वेतंबर तेरापंथ आदेशाचे दहावे प्रमुख, संत, योगी, अध्यात्मिक नेते, तत्वज्ञ, लेखक, वक्ते आणि कवी आचार्य श्री महाप्रज्ञ यांचा जन्मदिन.
१९२२ : के. असिफ हिन्दी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथालेखक (मृत्यू: ९ मार्च १९७१)
१९४६ : अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांचा जन्मदिन.
१९५५ : सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट व दूरदर्शन मालिका अभिनेत्री, गायक, मनोरंजन निर्माता, टीव्ही टॉक शो होस्ट आणि भारतीय जनता पक्षाच्या सदस्या किरण अनुपम खेर यांचा जन्मदिन.
१९५९ : लोकप्रिय भारतीय तेलगु भाषिक वक्ता व सनातन धर्मीय भाष्यकार चगंती कोटेश्वरा राव यांचा जन्मदिन.
१९६७ : प्रसिद्ध भारतीय अब्जाधीश उद्योगपती आणि आदित्य बिर्ला समूहाचे अध्यक्ष कुमार मंगलम बिर्ला यांचा जन्मदिन.
१९६८ : प्रसिद्ध भारतीय महाराष्ट्रीयन राजकारणी तसचं, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक, अध्यक्ष राज ठाकरे यांचा जन्मदिन.
१९६९ : साली प्रसिद्ध जर्मन माजी व्यावसायिक टेनिसपटू स्टेफनी मारिया यांचा जन्मदिन. त्यांनी आपल्या कारकिर्दीत एकूण २२ ग्रँड स्लॅम एकेरीचे जेतेपद जिंकले आहे.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२५ : पिअर चार्ल्स एल्फांट वॉशिंग्टन शहराचे रचनाकार फ्रेन्च अमेरिकन वास्तुविशारद आणि स्थापत्य अभियंता (जन्म: ९ ऑगस्ट १७५४)
१९१६ : गोविंद बल्लाळ देवल आद्य मराठी नाटककार, स्वतंत्र मराठी लेखन आणि इंग्रजी, फ्रेन्च व संस्कृत नाटकांची भाषांतरे इ. अनेक प्रकार त्यांनी हाताळले होते. (जन्म: १३ नोव्हेंबर १८५५)
१९२० : मॅक्स वेबर जर्मन अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ (जन्म: २१ एप्रिल १८६४)
१९४६ : जॉन लोगीबेअर्ड, ब्रिटिश शास्त्रज्ञ, आद्य दुरचित्रवाणी संशोधक.
१९६१ : प्रसिद्ध भारतीय नोबल पारितोषिक वेजेते भौतिकशास्त्रज्ञ सी. वी. रमण यांचे शिष्य भौतिकशास्त्रज्ञ सर करिमानीक्कम श्रीनिवास कृष्णन यांचे निधन.
१९८९ : सुहासिनी मुळगांवकर अभिनेत्री व संस्कृत पंडित, मराठी रंगभूमीवरील एकपात्री नाट्यप्रयोगांची सुरुवात त्यांनी केली. ३१ जानेवारी १९६० रोजी 'सौभद्र' नाटकाचा पहिला एकपात्री प्रयोग त्यांनी केला. या नाटकाचे त्यांनी विक्रमी ५०० प्रयोग केले. (जन्म: ????)
२००७ : कुर्त वाल्धहाईम संयुक्त राष्ट्रांचे चौथे सरचिटणीस (जन्म: २१ डिसेंबर १९१८)
२०१० : मनोहर माळगावकर इंग्रजी लेखक (जन्म: १२ जुलै १९१३)
२०११ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित रुद्विणा वादक भारतीय संगीतकार असद अली खान यांचे निधन.
२०२० : बॉलीवूड एक्टर सुशांत सिंग राजपुत यांच निधन.



राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत



# पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी बुथ प्रमुखांनी प्रयत्न करावेत-बोराडे

## बुथप्रमुखांच्या बैठकांना उत्स्फूर्त प्रतिसाद

मंठा। प्रतिनिधी

शिवसेनेची संघटनात्मक बांधणी करण्यासह मतदार यादी पुनर्विलोकन करण्याच्या दृष्टीने बूथप्रमुखांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए. जे. पाटील बोराडे यांनी केले. परतूर मंठा विधानसभा मतदारसंघातील मंठासह परतुर, नेर - सेवली येथे बूथप्रमुखांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाप्रमुख श्री बोराडे बोलत होते. या बैठकीला शिवसेना उपजिल्हाप्रमुख किसनराव मोरे, उद्योग सेनेचे जिल्हाप्रमुख प्रल्हादराव बोराडे, माजी सभापती संतोष वरकड, परतुर तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके, मंठा तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे, धनंजय पोहेकर, अरुण उफाड, अशोक भागडे,



प्रल्हाद खेडेकर, तुळशीराम कोहिरे, संदीप राठोड, प्रदीप ठोके, शरद भारुका, चैतन्य ठोंबरे, गोरख वटाणे, सचिन डवले, रमेश आकात, संजय कुकडे, अशोक सोळंके, आनंद वाकळे, नितीन राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने ‘‘ जेथे बुध मजबूत तेथे पक्ष मजबूत ‘‘ या संकल्पनेनुसार प्रत्येक बूथप्रमुखांनी आपल्या मतदान केंद्रावरील नवीन मतदार नोंदणीसह दुबार मतदार, नावामधील दुरुस्ती, स्थलांतरित व मयत मतदारांची नावे वगळणे या प्रक्रियांवर विशेष भर देऊन पक्ष संघटन अधिक मजबूत करावे असे आवाहन जिल्हाप्रमुख श्री बोराडे यांनी केले. एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये त्यासाठी बूथ प्रमुखांनी घरोघर जाऊन ही मोहीम यशस्वीपणे राबवावी असे सांगितले.या बैठकांना उपतालुका प्रमुख, विभागप्रमुख, उपविभाग प्रमुख, बूथप्रमुख, शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गंगासागर अपार्टमेंट येथे चालणा-या वेश्या अड्ड्यावर छापा

जालना। प्रतिनिधी

अनैतिक गानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षास गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की मंठा चौफुली जालना येथील श्रीजी हॉटेलच्या पाठीमागे लक्ष्मीनगर काळु पिठाची गिरणी जवळील गंगासागर अपार्टमेंट घरामध्ये घर मालक हा स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी बाहेरून गहिलांना आणुन त्या ठिकाणी ठेवून बाहेरील ग्राहकांना बोलवून त्यांच्या कडुन अनैतिक वेश्या व्यवसाय करीत असल्याची खात्रीलायक बातमी मिळाल्या वरुन सदर माहीती बाबत मा. पोलीस अधिक्षक यांच्याशी चर्चा करुन त्यांच्या सुचनेप्रमाणे स्थागुशाचे पोनि. श्री. पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे प्रभारी अधिकारी व स्टाफचे अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी छापा टाकला असता, गंगा सागर अपार्टमेंट मधील दुसऱ्या मजल्या वरील मालक उत्तम केंद्रे (फरार) एक महिला वय ४२ वर्ष दोघेही रा. गंगा सागर अपार्टमेंट ता. जि. जालना ३) ग्राहक अशोक हावरे वय -२४ वर्ष रा. रोहनवाडी असे मिळुन आले त्यांच्या ताब्यात ५४१०/- रु किंमतीचा मुद्देमाल मिळुण. आला आहे. पोलीसांची चाहुल लागल्याचा अंदाज येताच वरील आरोपी यांनी संगनमत करुन दोन महिला व एक ग्राहक यास पळवून लावले आहे.

वरील फरार आरोपी ग्राहक व पळवुन गेलेला अज्ञात एक ग्राहक दोन अज्ञात महिला यांच्या विरुद्ध महीलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ कलम ३,४,५,६ प्रमाणे प्रभारी अधिकारी ओ.मा.वा.प्र. कक्ष पोउपनि गणेश शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस ठाणे तालुका जालना हे करत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधु, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी, यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, पोउपनि रवी जोशी, पोउपनि संजय गवळी, महिला अंमलदार संगिता चव्हाण, निमा घनघाव, आरती साबळे व चालक संपोउपनि संजय कुलकर्णी यांनी केलेली आहे.

# महानगरपालिकाच्या शाळांच्या दयनीय अवस्थेची राज्य बालहक्क आयोगाने घेतली गंभीर दखल

जालना। प्रतिनिधी

जालना महानगरपालिका क्षेत्रातील शाळांची दयनीय अवस्था, अपुऱ्या शैक्षणिक सुविधा, मोडकळीस आलेल्या इमारती, स्वच्छतागृहांचा अभाव, शिक्षकांची कमतरता आणि घटती विद्यार्थी संख्या या गंभीर मुद्द्यांवर महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगासमोर मंगळवारी महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. या सुनावणीत आयोगाने जालना महानगरपालिका प्रशासन आणि शिक्षण विभागाला चांगलेच धारेवर धरत तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश दिले. सुनावणीस जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संगीता भागवत, मनपा उपायुक्त सुप्रिया चव्हाण, एम. व्ही. मंडलिक, समीर भोईर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महानगरपालिका क्षेत्रातील १६ शाळांमध्ये सध्या केवळ सुमारे ११०० विद्यार्थी शिक्षण घेत असल्याची बाब समोर आली. अनेक शाळांच्या इमारती जीर्ण अवस्थेत असून त्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आलेले नाही. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्वच्छतागृह, क्रीडा सुविधा आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी उपलब्ध नसल्याची बाब आयोगाने अत्यंत गंभीर मानली.

मनपा शाळांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेला निधी पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने खर्च केला जात आहे का, याबाबत आयोगाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. गेल्या पाच वर्षांत शिक्षणासाठी करण्यात आलेली अर्थसंकल्पीय तरतूद, प्रत्यक्ष खर्च आणि त्याचे तपशील आयोगाने मागविले आहेत. तसेच सर्व १६ शाळांचे छायाचित्रांसह सविस्तर अहवाल, शाळांना उपलब्ध निधी व खर्चाचा तपशील, शैक्षणिक सुविधांची सद्यस्थिती, स्ट्रक्चरल ऑडिट, स्वच्छतागृहे, परिसरातील झोपडपट्ट्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांची प्रवेशसंख्या वाढविण्यासाठी तयार केलेला आराखडा तसेच शाळांमध्ये झालेल्या सकारात्मक बदलांची माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी एका महिन्यानंतर जालना येथे होणार असून त्यावेळी महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य प्रत्यक्ष जालना दौरा करून मनपा शाळांची पाहणी करणार आहेत.

# ढालेगाव येथील दाधीच महाकुंभात समाजाच्या एकतेचे दर्शन

मंठा। प्रतिनिधी

दाधीच समाजाचे प्रेम, सहकार्य आणि एकतेने महाकुंभ २०२६ अविस्मरणीय ठरला. महाकुंभाच्या सांगता सोहळ्याला अखिल भारत वर्षीय दाधीच (दायमा) ब्राह्मण महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष लक्ष्मीनारायण दाधीच यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, हा समाज एकता आणि संघटनेचे उत्तम उदाहरण आहे. समाजाच्या या महाकुंभामुळे दाधिच समाजाला भविष्यात मोठी दिशा मिळणार आहे.दाधीच महासभा, महाराष्ट्र द्वारा अधिक मासामध्ये दाधीच महासभा महाराष्ट्राचे अध्यक्ष राधेशाम तिवारी यांच्या अध्यक्षतेखाली १ जून से ७ जून २०२६ या कालावधीत श्री क्षेत्र ढालेगावच्या गोदावरी तीरावर ऐतिहासिक असा सोहळा उत्साह आणि आनंदाच्या



वातावरणात पार पडला.

महाकुंभामध्ये श्रीमद्? भागवत कथा पूज्य कथा-वाचक आणि दाधीच रत्न श्री समाधानजी महाराज यांच्या ज्ञान आणि प्रेरणादायी कथेने भाविकांना आध्यात्मिक ऊर्जा मिळाली. समाजाच्या जनजागृतीमुळे दाधिच महा कुंभ अविस्मरणीय ठरला. संगीत संध्या मध्ये भजन सम्राट श्री धरणीधरजी दाधीच (कोलकाता), मंगल पाठ श्री रमेशजी दाधीच (गुवाहाटी), श्री दिनेशजी शर्मा (मालेगाव), श्री शुभम आणि श्री मनीषजी (जालना), कृष्ण आणि प्रणित जी व अन्य कलाकारांनी आपल्या प्रस्तुतीमुळे वातावरण भक्तीमय केले. इचलकरंजी दाधीच समाज आणि नवयुवक मंडळाद्वारे प्रस्तुत सुंदरकांडात भाविक तल्लीन झाले होते. महासभेचे महामंत्री विठ्ठल दायमा यांनी या महाकुंभाच्या सोहळ्यासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व समाज बांधव, मंडळांचे पदाधिकारी, आयोजक व स्वयंसेवकांचे विशेष आभार व्यक्त केले. निवास आणि भोजन व्यवस्थेसाठी सहकार्य करणारे बीड, माजलगाव, सेलू आणि मानवत समाज बंधूंचे तसेच मंच व्यवस्था, फोटोग्राफी, साउंड सिस्टम, लाइव्ह प्रसारण आणि एलईडी स्क्रीन सेवा प्रदान करणारे मराठवाडा अध्यक्ष श्री अशोक तिवारी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

महासभेने अखिल भारतवर्षीय दाधीच (दायमा) ब्राह्मण महासभा अध्यक्ष लक्ष्मीनारायण दाधीच, संचालक संजीव व्यास, राजेंद्र दायमा, समस्त राष्ट्रीय कार्यकारिणी, महाराष्ट्राचे जिल्हाध्यक्ष तथा विविध सामाजिक संस्थांचे आभार व्यक्त केले. श्री समर्थ वेद विद्यालय, संत-महात्मा संस्थान आणि गायत्री परिवार ढालेगाव यांचेही आभार मानले.

# गुणवत्ता ही केवळ कागदावर न राहता कौशल्यातून व्यक्त व्हावी-श्री विनायक चोथे

अंबड। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील विद्यार्थी गुण गौरव समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री विनायक चोथे यांनी बोलताना असे प्रतिपादन केले. ते पुढे बोलतांना म्हणाले की, आज कागदाच्या पदव्यावर अनेक गुणवंत दिसतात मात्र त्याच्यात कौशल्याचा अभाव दिसून येतो ज्यामुळे अनेक स्पर्धा परीक्षेच्या मुलाखती मध्ये त्यांना अपयश मिळते. यावेळी व्यासपीठावर श्री आदिनाथ ढाकणे पीएसआय अंबड, न. प. सभापती श्री राम लांडे, श्री अमोल टोपे, नंदकिशोर पुंड,श्री गणेश वाढेकर, अभिजित खटके, श्री महेश मोरे,



सचिन मस्के, श्री अशोक पालवे, एजाज शेख, गणेश राठी, गणेश गायकवाड, गणेश मुळे, विठ्ठल शिंदे, पृथ्वी राठोड आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. शशिकांत पाटील यांनी केले तर प्रास्ताविक एजाज शेख यांनी केले तर शेवटी आभार डॉ. सुनील सामग यांनी मानले. यावेळ नितीन मानवातकर, राधा राठोड, बाबासाहेब गोळे, शिवाजी हुलमुख, राम लांडे, आदिनाथ ढाकणे आदिनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख मार्गदर्शन राम लांडे, आदिनाथ ढाकणे आदिनी केले. यावेळी दहावी, बारावी व इतर स्पर्धा परीक्षेत यशस्वी १२७ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पुढे बोलतांना श्री चोथे म्हणाले की, पुढील शिक्षणाकरिता आपण शहरात जाल त्यावेळी चुकीच्या गोष्टीपासून दूर राहा. आपल्या आई वडिलांच्या कष्टाचे भान ठेवा. याशिवाय आवश्यक असणाऱ्या भाषेवर प्रभुत्व मिळवा तसेच सोबत व्यक्तिमत्व विकास व कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित केल्यास यश दृष्टीपथास सहज येते.अशा प्रकारचे समाजिक कार्यातुन आत्मविश्वास व उत्साह वाढून पुढील कार्यास प्रेरणा मिळते असे त्यांनी सांगितले. ह्या संस्कार सोहळ्यासाठी पंचक्रोशीतून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना पालक तसेच नागरिक उपस्थित होते.

# धनराज पवार यांचे पदवी परीक्षेत प्रथम श्रेणीत यश

जामखेड। प्रतिनिधी

येथील धनराज भगतसिंग पवार यांनी बी.ए. (मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम) पदवी परीक्षेत प्रथम श्रेणीत यश संपादन केल्याबद्दल शहरासह तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भटके-विमुक्त समाजातील धनराज पवार यांची यशोगाथा अनेक युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. कोरोना महामारीच्या काळात त्यांच्या आईचे निधन झाले. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असताना आणि स्वतः विवाहित असूनही अनेक अडचणींना सामोरे जात त्यांनी शिक्षणाची वाट सोडली नाही. अनेक वेळा उदरनिर्वाहाची चिंता असतानाही त्यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर शिक्षण सुरू ठेवले.

प्रतिकूल परिस्थितीतही जेष्ठांचे मार्गदर्शन, कुटुंबीयांचे सहकार्य आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर त्यांनी बी.ए. एम.सी.जे. परीक्षेत प्रथम श्रेणीत यश संपादन केले. त्यांच्या या यशामुळे समाजातील अनेक युवकांना संघर्षातून मार्ग काढण्याची प्रेरणा मिळाली आहे.

धनराज पवार हे जनतेच्या मनातील लोकपत्रकार म्हणून ओळखले जातात. सामाजिक, शैक्षणिक आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविणाऱ्या पवार यांची जामखेड तालुक्यासह विविध स्तरांवर लोकप्रियता दिसून येते. त्यांनी कोणतेही यश संपादन केले की, विविध संस्था, संघटना, मित्रपरिवार आणि शुभेच्छुकांकडून त्यांच्या सत्कारांचा अक्षरशः वर्षाव होतो. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सामाजिक,शैक्षणिक, राजकीय ,आरोग्य, कृषी, तंत्रज्ञान, क्रीडा आणि विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार व नातेवाईक यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



जिद्द अअसेल तर मार्ग सापडतो, परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, चिकाटी, मेहनत आणि जेष्ठांचे मार्गदर्शन असेल तर यश मिळविता येते. शिक्षण हीच प्रगतीची खरी गुरुकिल्ली आहे.

-धनराज पवार

# जिल्ह्यात शिवसेना संघटना अधिक सक्षम करण्यासाठी संपर्कमंत्री आशिष जयस्वाल यांची दमदार सुरुवात

जालना। प्रतिनिधी

शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे यांनी जालना जिल्ह्याच्या संपर्कमंत्रिपदाची जबाबदारी सोपवल्यानंतर राज्याचे राज्यमंत्री मा. आशिषजी जयस्वाल यांनी आज प्रथमच जालना जिल्ह्यात पक्ष संघटनेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. यावेळी जालना विधानसभेचे आमदार मा. अर्जुनजी खोतकर, आमदार मा. हिकमतजी उढाण, परभणी जिल्ह्याचे संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडित दादा भुतेकर, मंठा बाजार समिती सभापती ए. जी.बोराडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, बूथस्तरीय कार्यकर्ते तसेच संबंधित जबाबदार प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत बूथ लेव्हल एजंट नियुक्ती, विशेष सघन पुनरिक्षण मोहीम, मतदार यादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया, बूथनिहाय संघटनात्मक तयारी आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष बळकटीकरणाच्या विविध बाबींचा सविस्तर




आढावा घेण्यात आला.

यावेळी मा. आशिषजी जयस्वाल यांनी प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील नियुक्ती व मोहिमेच्या प्रगतीची माहिती घेत संबंधित पदाधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. शिवसेना संघटना गाव, बूथ आणि पानापर्यंत अधिक मजबूत करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मा. जयस्वाल म्हणाले, ‘‘शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे यांनी माझ्यावर जालना जिल्ह्याच्या संपर्कमंत्रिपदाची जी महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे, त्या विश्वासास पात्र ठरण्यासाठी मी पूर्णपणे कटिबद्ध आहे. संघटनात्मक बळकटी, कार्यकर्त्यांचा सन्मान आणि प्रत्येक बूथपर्यंत पक्षाची ताकद पोहोचविणे हेच माझे प्रमुख उद्दिष्ट राहील. जालना जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक वृद्धिंगत करण्यासाठी सातत्याने दौरे, बैठका आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. राज्य नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्ह्यात पक्ष संघटना आणखी सक्षम, सशक्त आणि विजयाभिमुख करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. बूथ मजबूत तर शिवसेना मजबूत; शिवसेना मजबूत तर जनतेचा विश्वास अधिक दृढ’’, या संदेशासह पक्ष संघटन अधिक प्रभावी करण्यासाठी व्यापक कृती आराखडा राबविण्यात येणार असल्याचेही मा. जयस्वाल यांनी सांगितले.

# नारायणा स्कुलच्या शिक्षकाकडून अल्पवयीन विद्यार्थीनीवर अत्याचार




**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरातील नामांकित असल्याचा स्वतःच मोठा गाजावाजा करून विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांकडून लाखो रूपयांच्या देणग्या आणि फिस उकळणाऱ्या नारायणा ई-टेक्नो स्कूलमधील नववीच्या वर्गात शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर शाळेतील शिक्षकाकडूनच अत्याचार केल्याची अत्यंत संतापजनक आणि तितकीच वेदनादायी घटना जालन्यात उघडकीस आली आहे.**

याप्रकरणी कदीम जालना पोलिसांनी नराधम शिक्षक विक्की रॉबिनसन शिंदे (रा. गोकुळवाडी, जालना) याच्या विरोधात अत्याचाराचा गुन्हा दाखल केला असून त्याला अटक केली आहे. दरम्यान, हा किळसवाणा प्रकार समोर येताच जालना शहरातील पालकांनी या शाळेच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त केला असून नारायणा स्कुलसारख्या आणखीही काही शाळा उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून पोलीसांनी या बाबीचा गांभीर्याने शोध घ्यावा अशी मागणी पालकांनी केली आहे.

# अंबाजोगाई-आपेगाव रस्त्याची भयानक अवस्था

## ७८ किलोमीटरमध्ये १५०० खड्डे, प्रवाशांची गैरसोय व एसटी सेवा बंद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई ते आपेगाव या महत्त्वाच्या जिल्हा परिषद रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून अवघ्या ७ ते ८ किलोमीटरच्या अंतरात तब्बल १५०० हून अधिक खड्डे पडल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. खड्ड्यांमुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.

ऐन पावसाळ्याच्या तोंडावर आता ही अवस्था आहे तर भर पावसाळ्यात काय अवस्था होईल खड्ड्यांच्या विळख्यात अंबाजोगाईआपेगाव रस्ता; ७ ते ८ किलोमीटरमध्ये तब्बल १५०० खड्डे, नागरिकांचा संताप

शाळकरी विद्यार्थी बससेवा बंद करण्यात आली आहे, वाहनधारक व प्रवाशांचा जीव धोक्यात; हिवरा खुर्द, सोमनाथ बोरगाव, धानोरा, माकेगाव, कानडी बदन आपेगाव यांसह परिसरातील अनेक गावांना जोडणारा हा प्रमुख मार्ग पुढे लातूर महामार्गाला जोडतो. या रस्त्यावरून दररोज शेतकरी, कामगार, नोकरी करणारे नागरिक, शाळकरी मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी व अनेक वाहनधारकांचा प्रवास सुरू असतो. मात्र



रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

रस्त्याची दुरवस्था इतकी गंभीर झाली आहे की काही भागात विद्यार्थ्यांच्या प्रवासाच्या अडचणीमुळे महामंडळाच्या बससेवा बंद करण्यात आली आहे महामंडळानी सुद्धा ऐनवेळी पाठफिरवली अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून याला जबाबदार कोण, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

विशेष म्हणजे निवडणुकीच्या काळात याच मार्गावरील विकासाची आश्वासने देणारे लोकप्रतिनिधी व संबंधित प्रशासनाचे अधिकारी या रस्त्याच्या प्रश्नाकडे जाणून बुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर बनली असून दुचाकीस्वारांना खड्डे चुकवताना तोल जाऊन अपघात होण्याच्या घटना घडत आहेत. चारचाकी वाहनांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाकडे तक्रारी करूनही अद्याप ठोस दुरुस्तीचे काम सुरू झाले नसल्याची नाराजी व्यक्त केली आहे. ''या खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करताना प्रत्येकवेळी जीव मुठीत धरावा लागतो. प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अन्यथा सर्व गावकरी व वाहनधारकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल,'' असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# तर सोमवारी बीडमध्ये आंदोलन -राजेंद्र मस्के

## रोहित पवार यांच्या पंढरपूर येथील अन्नत्याग आंदोलनात सहभाग

बीड । प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांना समान न्याय मिळावा, कर्जमाफी योजनेतील जाचक अटी तात्काळ रद्द कराव्यात आणि सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी या मागणीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे युवा नेते व मा.आमदार रोहीत दादा पवार यांनी १२ जून २०२६ शेतकरी व सामान्य जनतेचे आराध्य दैवत पांडुरंगाच्या पंढरपूर नगरीत अन्नत्याग आंदोलन




सुरू केले आहे.

शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदना आणि संघर्षाला न्याय मिळवून देण्यासाठी सुरू असलेल्या या लढ्याला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) बीड चे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के आणि शेतकरी शिष्टमंडळासह जिल्ह्यातील कर्जबाजारी शेतकरी बांधवांच्या वतीने लेखी निवेदन व आसूड देऊन पाठिंबा दिला.तसेच जिल्ह्यातील शेतकरी चळवळीचे ◀◀ पान ३ वर

# सज्ज व्हा ! मशाल हातात घ्या ! आणि शिवसेनेला गतवैभव परत मिळवून द्या-आ.अंबादास दानवे

बीड । प्रतिनिधी

बाळासाहेबांची शिवसेना ही कट्टर, निष्ठावान व प्रामाणिक पणे काम करणाऱ्या शिवसैनिकांची आहे . शिवसेना म्हणजे फक्त चिन्ह नाही तर ती हिंदु हृदय सम्राट बाळासाहेबांची प्रखर विचार धारा आहे अश्या विचारधारे वर काम करणाऱ्या लाखो शिवसैनिकांच्या निष्ठेवर आजही शिवसेना ताकदीने उभी आहे. कितीही गद्दार शिवसेना सोडून गेले तरी शिवसेना आहे तिथेच आहे. असे परखड मत माजी विरोधी पक्षनेते तथा आमदार अंबादास दानवे यांनी शिवसेना (



उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या जिल्हास्तरीय बैठकीत शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना म्हटले आहे.

सदरील बैठकी मध्ये जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणी, पक्षविस्तार, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची तयारी, बूथनिहाय संघटन, इ ङ - नियुक्ती या विषया अंतर्गत माजी विरोधी पक्षनेते तथा आमदार अंबादास दानवे व शिवसेना संपर्क प्रमुख परशुराम जाधव, यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती.

या प्रसंगी बोलताना संपर्क प्रमुख परशुराम जाधव यांनी म्हटले की शिवसैनिकांनी आता येणाऱ्या निवडणुका साठी सज्ज व्हायला पाहिजे. प्रत्येक बुथवर इ ङ - ची नियुक्ती करून ऐक बूथ दहा शिवसैनिक तयार करावे, गावोगावी शाखा उघडून शिवसेनेचा विचार आणि मशाल चिन्ह घरोघरी पोहचवा. शिवसेनेचा कठीण काळ लवकरच निघून जाईल व शिवसेनेचा सुवर्ण काळ येईल. शिवसैनिकांनी तत्परतेने कामाला सुरुवात करावी. गद्दारानी धोका दिला, सत्ता गेली, तरी शिवसैनिक ◀◀ पान ३ वर

# परळीतून ५ कोटींच्या खंडणीसाठी अपहरण झालेल्या व्यक्तीची सुटका; एलसीबीने चौघांना ठोकल्या बेड्या

बीड / परळी । प्रतिनिधी

परळी औष्णिक विद्युत केंद्र परिसरातून ५ कोटी रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण करण्यात आलेल्या ५४ वर्षीय इसमाची स्थानिक गुन्हे शाखेने शिताफीने सुटका केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अत्यंत थरारकपणे माग काढत ४ आरोपींना अटक केली आहे. तुकाराम पंढरीनाथ मुंडे (वय ५४, रा. संगम, सध्या रा. थर्मल कॉलनी, परळी) असे सुटका करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

दिनांक ४ जून २०२६ रोजी दुपारी १:३० ते २:०० वाजेच्या सुमारास परळी औष्णिक विद्युत केंद्र परिसरातून अज्ञात आरोपींनी तुकाराम मुंडे यांचे अज्ञात कारणासाठी अपहरण केले होते. या घटनेप्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २६६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सीसीटीव्हीच्या मदतीने अमरावतीपर्यंत माग

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी तात्काळ विशेष तपास पथक तयार केले. पथकाने घटनास्थळाला भेट देऊन परिसरातील उउढत फुटेजची कसून तपासणी केली. त्यामध्ये गुन्ह्यात वापरलेली मारुती सुझुकी कंपनीची गाडी निष्पन्न झाली. या गाडीचा माग काढत पोलीस पथक थेट अमरावतीपर्यंत पोहोचले.

अमरावती येथे पोहोचल्यानंतर पोलिसांचे पथक पिडीत आणि आरोपींचा माग काढत असताना, पोलिसांचा सुगावा लागताच आरोपींनी पीडित तुकाराम मुंडे यांच्या डोळ्यावर पट्टी बांधून त्यांना अमरावती जिल्ह्यातील हिंगणघाट येथे सोडून दिले. पोलिसांनी तात्काळ मुंडे यांना ताब्यात घेतले आणि त्यांची चौकशी केली असता, ५ कोटी रुपयांच्या खंडणीसाठी हे अपहरण केल्याचे समोर आले.

या गुन्ह्यात १) सचिन नारायण वंजारे, २) संतोष नारायण वंजारे (दोघे रा. परळी), ३) अल्केश विष्णुजी अवजाडे आणि ४) शुभम राजू पिंपळकर (दोघे रा. मंगरूळ चावला, जि. अमरावती) यांनी मिळून हे अपहरण केल्याचे निष्पन्न झाले.

त्यापैकी संतोष नारायण वंजारे याला सर्वप्रथम बीड ◀◀ पान ३ वर

# ज्ञानराधा मल्टीस्टेटचे शाखाधिकारी गजानन घोडकेंना अटकपूर्व जामीन!

बीड । प्रतिनिधी

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या बीड येथील शिवाजीनगर शाखेचे तत्कालीन शाखाधिकारी गजानन नारायण घोडके यांना उच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला असून त्यांचा अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे.

ज्ञानराधा मल्टीस्टेटचे महाराष्ट्रासह राज्याबाहेरही विस्तृत जाळे पसरले होते. आकर्षक व्याजदरांचे आमिष दाखवून लाखो ठेवीदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी संस्थेचे अध्यक्ष सुरेश कुटे, त्यांच्या पत्नी अर्चना कुटे तसेच इतर पदाधिकाऱ्यांविरोधात विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.या प्रकरणात सुरेश कुटे, अर्चना कुटे आणि शिवाजीनगर शाखेचे तत्कालीन शाखाधिकारी गजानन नारायण घोडके यांच्याविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाणे तसेच बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यात गजानन घोडके यांनी दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज सत्र न्यायालय, बीड यांनी यापूर्वी फेटाळून लावला होता. त्यानंतर ड. सुदर्शन साळुंके यांच्या मार्फत घोडके यांनी उच्च न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. त्यावर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने त्यांना अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला असून प्रकरणाची पुढील सुनावणी ३ जुलै २०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे.या प्रकरणात गजानन घोडके यांच्यावतीने ड. सुदर्शन साळुंके यांनी काम पाहिले, तर सरकार पक्षातर्फे ड. मुकेश गोयंका यांनी बाजू मांडली.

# इमामपूर रोडवरील डोंगर भागात अनधिकृत उत्खनन

## तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची कारवाई

बीड । प्रतिनिधी

इमामपूर इमामपूर रोडवरील डोंगर भागात अनधिकृत उत्खनन करणाऱ्या दोन हायवावर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी व पथकाने कारवाई केली .

सदर कारवाई ही स्थानिक प्रशासनाच्या जलद प्रतिसाद आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली आहे.

इमामपूर रोड येथे मिळालेल्या माहितीनुसार हा छापा तहसीलदारांनी स्वतः परिसराची पाहणी करताच टाकला.



कारवाईदरम्यान टिप्परचे मालक आणि चालक यांची चौकशी करण्यात आली व संबंधित वाहने ताब्यात घेण्यात आली. या कारवाईत नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , मंडळ अधिकारी अनिल तांदळे, ग्राम महसूल अधिकारी प्रशांत कुलकर्णी, हरिदास काकडे, सचिन एरंडे, तफेदार दिनेश माने आणि गणेश चव्हाण यांचे सहकार्य होते.

तहसीलदार शेळके यांनी सांगितले की, अनधिकृत उत्खननामुळे शहर आणि परिसरातील नैसर्गिक समतोल बिघडण्याची भीती होती, तसेच स्थानिक रहिवाशांना धोकाही निर्माण होऊ शकला असता. पुढील तपास प्रशासन करत असून दोषींविरुद्ध दंडात्मक कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी माहितीही त्यांनी दिली.

# महाराष्ट्र वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी घेतली तोहिद खान कुटुंबीयांची भेट !

## एक लाख रुपयांची मदत केली जाहीर

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे गटाच्या शिवसेना अल्पसंख्यांक विभागाचे राज्यप्रमुख समीर गुलाम नबी काझी यांनी शुक्रवार, दिनांक १२ जून २०२६ रोजी परळीला जाऊन तोहीद खान कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांनी खान कुटुंबीयांना एक लाख रुपयांची मदत जाहीर केली आणि तोहीद



खान यांचे प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालवून त्यांची क्रूरपणे हत्या करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली.

यावेळी त्यांच्यासोबत शिवसेना बीड जिल्हाप्रमुख सरफराज काझी, समाजसेवक नूर लाला, परळीचे उपनगराध्यक्ष राजा खान पठाण, माजी नगरसेवक शरीफ रोशन, युवा उद्योजक शकील बागवान, हजबो उमराह टूर्स अँड ट्रॅव्हल्सचे संचालक सय्यद अब्दुल कबीर, सामाजिक कार्यकर्ते अतहर खतीब, त्यांचे खाजगी स्वीय सहाय्यक अब्दुल रहीम उर्फ बाबाभाई यांच्यासह परळी शहरातील सामाजिक युवक कार्यकर्ते व प्रतिष्ठित नागरिक आवर्जून उपस्थित होते. याप्रसंगी समीर काझी यांनी तोहीद खान कुटुंबीयांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. तोहीद खान यांचे प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालवून त्यांची क्रूरपणे हत्या करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि मुस्लिम समाजाच्या ◀◀ पान ३ वर

# बस स्थानकावरील महिला चोरट्यांच्या टोळीचा पर्दाफाश

## शिवाजीनगर पोलिसांची धडक कारवाई, दोन महिला अटकेत

बीड । प्रतिनिधी

बीड येथील बस स्थानकावर मागील काही दिवसांपासून महिला प्रवाशांचे दागिने, मोबाईल आणि पर्स चोरीला जाण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली होती. या गुन्ह्यांची गंभीर दखल घेत शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाने (गुन्हे शोध पथक) अत्यंत धाडसी कामगिरी करत बस स्थानकावरून चोरी करणाऱ्या दोन महिला आरोपींना रंगेहात अटक केली आहे. या कारवाईमुळे बस प्रवाशांना, विशेषतः महिलांना मोठा दिलासा मिळाला असून बीड बस स्थानक अधिक सुरक्षित करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी मोठे पाऊल उचलले आहे.

दिनांक १२ जुन रोजी दुपारी दीड ते सव्वादोन वाजेच्या सुमारास बीड बस स्थानकावर फिर्यादी महिला बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन दोन संशयित महिलांनी त्यांना धक्का मारण्यास सुरुवात केली. या गडबडीत त्यांनी फिर्यादीच्या हातातील खाकी रंगाची पर्स बळजबरीने हिसकावून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, फिर्यादीने तात्काळ आरडाओरडा केल्याने बस स्थानकावर कर्तव्यावर असलेल्या पोलिसांनी व सुरक्षा रक्षकांनी तत्परता दाखवत दोन्ही महिलांना जागीच पकडले. त्यांच्याकडून चोरीची रोकड व पर्स हस्तगत करण्यात आली असून, शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. १५२/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे चोरटे अत्यंत चपळाईने आणि सामान्य वेशात वावरत असत. सामान्यतः महिला चोर असू शकत नाहीत या गैरसमजाचा आणि भोळेपणाचा फायदा या महिला चोरट्या घेत होत्या. बसमध्ये चढताना जागा मिळवण्याच्या गडबडीत त्या गर्दीत घुसतात आणि प्रवासी महिलांचे लक्ष विचलित करून नकळत बॅग कापून किंवा चेन उघडून मौल्यवान वस्तू चोरतात. काही वेळेस गर्दीत हिसकावून किंवा बळजबरीनेही वस्तू चोरण्यास त्या मागेपुढे पाहत नव्हत्या.

सदरची धडक कामगिरी बीड जिल्ह्याच्या प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटराम आणि शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या योग्य मार्गदर्शनाखाली शिवाजीनगरच्या डीबी पथकातील एएसआय संतोष राऊत,पोह. रवींद्र आघाव, पोना. ज्ञानेश्वर मराडे, पोअ. सचिन आगलावे, अनंत गिरी, बाळू रहाडे, दिलीप राठोड, अशोक राडकर, शुभम सोनवणे, अनिल घटमळ यांनी केली आहे. विशेष कौतुक: या संपूर्ण कारवाईत आणि गुन्ह्याचा छडा लावण्यामध्ये महिला पोलीस जमादार मीरा पाटील यांनी अत्यंत मोलाची भूमिका बजावली. मीरा पाटील यांनी घेतलेली मेहनत, त्यांची धडपड आणि दाखवलेले प्रसंगावधान यामुळेच या आंतरजिल्हा/मोठ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना यश आले आहे.

### प्रवाशांना आवाहन

**बस स्थानक परिसरात प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पोलीस तैनात आहेतच, परंतु प्रवाशांनी स्वतः देखील सतर्क राहणे आवश्यक आहे. पोलिसांनी खालील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. गर्दीतून प्रवास करताना शक्यतो मोठ्या प्रमाणात रोकड किंवा मौल्यवान सोन्याचे दागिने सोबत बाळगणे टाळावे. बॅगकडे दुर्लक्ष करू नका: बसमध्ये चढल्यावर किंवा सीटवर बसल्यावर आपल्या मौल्यवान वस्तू असलेल्या बॅगा खाली किंवा वरच्या कप्प्यात ठेवून त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नका. बॅग नेहमी स्वतःच्या ताब्यात व समोर ठेवावी. दिसण्यावर जाऊ नका: आपल्या अवतीभोवती अत्यंत सामान्य वेशात दिसणारी व्यक्ती किंवा महिला देखील चोर असू शकते, त्यामुळे गर्दीत शेजारी उभे राहणाऱ्या व्यक्तींवर बारीक लक्ष ठेवा. बस स्थानक किंवा प्रवास दरम्यान कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास अथवा चोरीचा प्रकार घडल्यास तात्काळ कर्तव्यावर असलेल्या पोलिसांशी किंवा पोलीस चौकीशी संपर्क साधावा. बीड बस स्थानक अधिक सुरक्षित आणि भयमुक्त करण्यासाठी शिवाजीनगर पोलीस कटीबद्ध आहे.**

**पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन शिवाजीनगर, बीड.**

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26